cmyk

## संपादकीय

### सरकारने आश्वासनांपासून पळच काढला

अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्याची त्यांची ही अकरावी वेळ होती. जेमतेम काही महिन्यांपूर्वीच विधानसभेच्या निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर सादर झालेला हा पहिला अर्थसंकल्प होता. निवडणुकातील जाहीरनाम्यात भरमसाठ घोषणा आणि आश्वासने देण्यात आली होती. त्याच्या पूर्ततेच्या दृष्टीने या अर्थसंकल्पात काय तरतुदी असतील याविषयी कमालीची उत्सुकता होती. पण अर्थसंकल्पाचे अजित पवारांचे भाषण ऐकल्यानंतर त्यांनी या जाहीरनाम्यातील सगळ्याच तरतुदींना रीतसर फाटा दिल्याचे स्पष्ट दिसते आहे.

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

### राज्यसभेत खरगेंच्या ठोकेंगेच्या वक्तव्यावरून गोंधळ

नवी दिल्लीः मंगळवारी, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या विधानावरून राज्यसभेत प्रचंड गोंधळ झाला. खरंतर, दिग्विजय सिंह बोलत असताना खरगे त्यांच्या आसनावर उभे राहिले. यावर उपसभापती हरिवंश यांनी त्यांना अडवले. यावर खरगे म्हणाले, ही कोणत्या प्रकारची हुकूमशाही आहे? मी तुम्हाला हात जोडून बोलण्याची परवानगी मागत आहे. यानंतर हरिवंश म्हणाले की, तुम्ही सकाळीच बोलला आहात. आता बोलण्याची वेळी दिग्विजय सिंह यांची आहे, म्हणून कृपया खाली बसा. यानंतर, खरगे म्हणाले, मी नक्कीच बोलेन, पण तुम्हाला जे काही ठोकायचे आहे ते आम्ही व्यवस्थित ठोकू, आम्ही सरकारलाही ठोकणार.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-३१८ | बुधवार, दि.१२ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये

# हरभऱ्याचे भाव पाडण्यासाठी सरकारची खेळी

## • पिवळा वाटाण्याची पुन्हा मुक्त आयात, बाजारभावावर होणार परिणाम

**पुणे । प्रतिनिधी**

**हरभरा उत्पादकांना अडचणीत आणणाऱ्या पिवळा वाटाण्याच्या मुक्त आयातीला केंद्र सरकारने ३ महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. या काळात आणखी ४ ते ५ लाख टन पिवळा वाटाणा आयात होऊ शकतो, असा अंदाज आहे. त्यामुळे बाजारात आता शेतकऱ्यांच्या हरभऱ्याची आवक आणि पिवळा वाटाणा आयात यामुळे दबाव वाढण्याची शक्यता आहे. बाजारात आवकेचा दबाव असेपर्यंत हरभरा हमीभावापेक्षा कमी दरात विकला जाऊ शकतो, असा अंदाजही अभ्यासकांनी व्यक्त केला.**

केंद्र सरकारने पिवळा वाटाण्याची मुक्त आयातीला ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगाने याविषयी अधिसूचना काढली आहे. म्हणजेच पिवळा वाटाणा आयातीवर कोणत्याही प्रकारचे किमान आयात मूल्य किंवा आयात शुल्क लागणार नाही. तसेच आयात कोटाही नसेल. मात्र आयात करताना इम्पोर्ट मॉनिटरिंग सिस्टमवर त्याची नोंद करावी लागेल. केंद्र सरकारने उडदाच्या मुक्त आयातीला एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत भारतात कोणत्याही बंधनाशिवाय उडीद आयात होणार आहे. मागील वर्षभर वाटाण्याच्या मुक्त आयातीमुळे हरभरा आणि तुरीचे भाव कमी होण्यास मदत झाली. हरभऱ्याचा भाव मोठ्या प्रमाणात तुटला होता. आतातर हरभऱ्याचे भाव हमीभावाच्या खाली आले आहेत. तुरही हमीभावाच्या खाली विकली जात आहे. सरकारच्या धोरणामुळे केवळ शेतकरीच नाही तर व्यापारी

◀◀ पान २ वर



### बाजारभाव हमीभावाच्या खालीच राहणार

सध्या शेतकऱ्यांचा माल बाजारात येत आहे. आवकेचा दबाव वाढत आहे. आता त्यातच पिवळा वाटाणाही आयात होणार आहे. म्हणजेच हरभरा बाजारावर आता शेतकऱ्यांच्या मालाची आवक आणि पिवळा वाटाण्याची आयात याचा दबाव असणार आहे. हरभऱ्याला सरकारने यंदा ५ हजार ६५० रुपये हमीभाव जाहीर केला. आयातीमुळे आवकेचा दबाव असेपर्यंत बाजार हमीभावाच्या खालीच राहू शकतो, असा अंदाज अभ्यासकांनी व्यक्त केला.

## क्रीडा मंत्रालयाने भारतीय कुस्ती महासंघावरील बंदी उठवली

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**भारतीय कुस्ती महासंघाला मोठा दिलासा मिळाला आहे. क्रीडा मंत्रालयाने भारतीय कुस्ती महासंघावरील बंदी उठवली आहे. २४ डिसेंबर २०२३ रोजी क्रीडा मंत्रालयाने कुस्ती महासंघाला निलंबित केले होते.**





क्रीडा मंत्रालयाने संजय सिंग यांच्या नेतृत्वाखालील भारतीय कुस्ती महासंघाच्या कार्यकारी समितीला क्रीडा संहितेचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली निलंबित केले होते. कुस्तीची जागतिक संस्था युनायटेड वर्ल्ड रेसलिंगने गेल्या वर्षी संजय सिंग यांच्या अध्यक्षतेखालील कुस्ती महासंघावरील निलंबन मागे घेतले होते. यानंतर, भारतीय ऑलिंपिक असोसिएशनने भारतातील कुस्तीच्या दैनंदिन कामकाजाची देखरेख करणाऱ्या भूपिंदर सिंग बाजवा यांच्या अध्यक्षतेखालील तदर्थ समिती बरखास्त करण्याचा निर्णय घेतला. कुस्ती महासंघाच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष संजय सिंग यांना युनायटेड वर्ल्ड रेसलिंग आणि भारतीय ऑलिंपिक असोसिएशनकडून दिलासा मिळाला असला

◀◀ पान २ वर

# निवडणुकीसाठी महिला आणि शेतकऱ्यांना फसवले!

## विरोधकांची सरकारवर जोरदार टिका



### “ दिल्लीतही भाजपचीच सत्ता मग महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींसोबत भेदभाव का?—आदित्य ठाकरे



राज्य सरकारने लाडक्या बहिणींची फसवणूक केली आहे, निवडणुकीपूर्वी दिलेला शब्द फिरवला आहे. असा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला. दिल्लीत भाजपची सत्ता आहे तेथील लाडक्या बहिणींना २५०० रुपये दिले जातात. महाराष्ट्रातही भाजपची सत्ता आहे पण इथल्या लाडक्या बहिणींना मात्र १५०० रुपये दिले जातात. हा भेदभाव का केला जात आहे? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी सरकारला केला आहे. राज्य सरकारकडून २१०० रुपये देणे अपेक्षित होते. पण तेही दिले गेले नाही. दुसरीकडे दिल्लीतील लाडक्या बहिणींना २५०० रुपये दिले जातात. महाराष्ट्राच्या बाबतीत हा भेदभाव का केला जातो? असा सवाल करत त्यांनी सांगितले की, आमचे सरकार आले असते तर आम्ही लाडक्या बहिणींना ३००० रुपये दिले असते असेही ठाकरे म्हणाले.

**मुंबई । प्रतिनिधी**


**निवडणुकीसाठी लाडक्या बहिणीला फसवले, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन देऊनही कर्जमाफी केली नाही, असे म्हणत विरोधकांनी सरकारवर टिकेची राळ उठविली. उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांच्यासह विरोधी नेत्यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना लक्ष्य करीत मंगळवारी (दि.११) अर्थसंकल्पावर आपले मत व्यक्त केले.**

शेतकऱ्यांना निवडणुकीत कर्जमाफीचे आश्वासन दिले. परंतु कर्जमाफी केली नाही. शेतकऱ्यांना फसवले, यावरून विरोधकांनी सभागृहात आवाज उठवला. जाधव म्हणाले, “भाजपच्या जाहीरनाम्यात शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन दिले, पण आता मात्र कर्जमाफीबद्दल शब्दही उच्चारायला

◀◀ पान २ वर

# सर्व राष्ट्रीय अन् राज्य पक्षांना चर्चेसाठी आमंत्रण

### टीका होत असल्याच्या पार्श्वभुमीवर निवडणूक आयोगाने उचलले मोठे पाऊल





**नवी दिल्ली । वृतसंस्था**

देशभरातील निवडणूक प्रक्रियेवरून विरोधी पक्ष आणि नेत्यांनी वारंवार केंद्रीय निवडणूक आयोगाला लक्ष्य केले आहे. या टीकेनंतर आयोगाने मोठे पाऊल उचलले आहे. या संदर्भातील आयोगाने सर्व पक्षांना मंगळवारी (दि.११) नोटीस दिल्याचे समोर आले आहे. त्यात राष्ट्रीय आणि राज्यातील राजकीय पक्षांकडून कोणत्याही निराकरण न झालेल्या समस्यांसाठी ३० एप्रिलपर्यंत सूचना मागवल्या आहेत.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्रासह निवडणूक याद्यांतील घोळाबाबत संसदेत प्रश्न उपस्थित करत या संदर्भात चर्चेची मागणी केली होती. तसेच या संदर्भात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची देखील भेट घेतली होती. त्या पार्श्वभूमीवर दिलेल्या निर्देशांचा विचार करून केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्व पक्षांना सूचना मागवत भेटीचे आमंत्रण दिले आहे. निवडणूक आयोगाने यासंबंधीच्या निवेदनात म्हटले की, संवाद साधण्याच्या आमंत्रणासाठी राजकीय पक्षांना वैयक्तिक पत्र जारी केले आहेत. गेल्या आठवड्यात झालेल्या निवडणूक

◀◀ पान २ वर

### “ लोकसभेत मल्लिकार्जुन खर्गे यांनी उठविला आवाज

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहूल गांधी आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी मंगळवारी मतदार याद्यांचा मूद्दा संसदेत उपस्थित केला. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने सर्व पक्षांना चर्चेचे निमंत्रण दिले आहे. मंगळवारी, बिजू जनता दलाचे (बीजेडी) शिष्टमंडळाने निवडणूक आयोगाला भेट दिली. त्यांनी २०२४ च्या ओडिशातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतांमधील फरकांबाबत भारतीय निवडणूक आयोगाला एक पाठपुरावा निवेदन सादर केले.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ मार्च २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २००.५० क्विंटल | २,२०० | २,९२० | २,६३७ |
| ज्वारी/हायब्रिड :२६७.५०क्विंटल | १,९०० | ३,७४६ | २,३५२ |
| मका/लोकल:२०.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ९.०० क्विंटल | ६,९०० | ७,१०० | ७,००० |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ३२.०० क्विंटल | २,०४० | ३,१६३ | २,७४६ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ३४.५० क्विंटल | ३,९११ | ३,९५० | ३,९२४ |
| हरभरा: ४३.०० क्विंटल | ४,५०० | ५,२०० | ४,९५४ |

# एकतर आम्ही जाणार किंवा सरकार जाणार

### मनोज जरांगेचा फडणवीसांना थेट इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा मुंबईला धडकणार असल्याचा इशारा दिला आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्षात ठेवावे, असा एल्गार देखील त्यांनी केला आहे. मराठा आरक्षण आणि मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे हत्याकांड प्रकरण मनोज जरांगे यांनी चांगलेच लावून धरले आहे. यावरून मनोज जरांगे सातत्याने महायुती सरकारवर टीका करत आहेत.



मनोज जरांगे म्हणाले, एकतर आम्ही जाणार किंवा सरकार जाणार. तुम्ही गोड बोलून तर आमचा काटा काढला. पण आम्ही सुद्धा तुम्हाला खेटू आणि आरक्षण घेऊनच राहू. मी गोडीत सांगतो, यापुढे आंदोलन लोकशाहीतच होणार आहे. पण मॅच फायनल असणार आहे. एकतर आम्ही जाणार किंवा सरकार जाणार, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. आता यापुढे कमी सांगायचे आणि कमी बोलायचे, पण आता करून दाखवायचे आहे. म्हणजे आता इथून पुढे सरकारची चाल खेळावी लागणार आहे. सरकार सुद्धा निवडून येईपर्यंत काही कळू देत नाही, बोलू देत नाही. फक्त गोड बोलते, आता अचानक आंदोलन करायचे आहे. या भूमिकेशिवाय

◀◀ पान २ वर

# सरकारची नजर आता भोंग्यावर...!

### ५५ डेसिबलचे उल्लंघन केल्यास कारवाई, देवेंद्र फडणवीसांची मोठी घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातल्या प्रार्थनास्थळावरच्या भोंग्यावर आता सरकारची करडी नजर असणार आहे. जो कुणी ५५ डेसिबलच्या नियमांचे उल्लंघन करणार त्याची परवानगी कायमसाठी रद्द करण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. प्रार्थनास्थळावरील भोंग्यांच्या आवाजाची तीव्रता तपासण्याचे काम हे पोलिस निरीक्षकांचे असून त्याची माहिती त्यांनी प्रदूषण नियंत्रण बोर्डला देणं गरजेचं आहे असे फडणवीस म्हणाले. राज्यातील प्रार्थनास्थळांवरील भोंग्यांच्या आवाजाबाबत अनेक तक्रारी आल्या आहेत. त्यावर मंगळवारी विधानसभेत प्रश्न विचारण्यात आला.**

उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कायद्यानुसार, अधिक डेसिबलने हे भोंगे वाजत असतील तर प्रदूषण नियमक मंडळ कारवाई करते. कुणालाही सरसकट भोंग्याची परवानगी देणार नाही. निश्चित कालावधीसाठी परवानगी दिली जाईल. त्यानंतर जर पुन्हा कुणाला परवानगी हवी असेल तर ती पोलिसांकडून नव्याने घ्यावी लागेल. केंद्रीय कायद्यानुसार प्रदूषण बोर्डने ही कारवाई

◀◀ पान २ वर

#### उल्लंघन केल्यास परवानगी कायमची रद्द

देवेंद्र फडणवसी म्हणाले की, “राज्यात जर कुणी ५५ डेसिबल आणि ४५ डेसिबलचे उल्लंघन केले जाईल त्याला पुन्हा कधीच परवानगी दिली जाणार नाही. भोंग्यांची जप्ती केली जाईल. याचे तंतोतंत पालन होत आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी ही पोलिस निरीक्षकांची असेल. पोलिस निरीक्षकाने प्रत्येक प्रार्थनास्थळाला भेट देऊन तपासणी करावी. त्यासाठी प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये मीटर देण्यात आले आहे. त्यानंतर जर कुणाकडून उल्लंघन केलं जात असेल तर त्याची माहिती पहिला प्रदूषण नियंत्रण बोर्डला दिली पाहिजे. दुसऱ्या टप्प्यामध्ये अशा भोंग्यांना पुन्हा परवानगी दिली जाणार नाही.

#### भोंग्यांच्या आवाजाची जबाबदारी आता पोलिस निरीक्षकांवर

प्रार्थनास्थळांवर सरसकट भोंग्यांची परवानगी दिली जाणार नाही. यापुढे प्रार्थनास्थळावरील भोंग्यांची आवाजाची मर्यादा आणि यासंदर्भातील नियमांचे पालन होत आहे की नाही, याच्या तपासणीची जबाबदारी संबंधित पोलिस ठाण्याच्या निरीक्षकांवर सोपविण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

# नारायणगडाचे दहावे उत्तराधिकारी म्हणून संभाजी महाराज यांची निवड

## संत -महंतांच्या उपस्थितीत पार पडला सोहळा

**शंकर भालेकर । शिरूर**

**कुलभूषण महात्मा समर्थ स्वामी नारायण महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नारायण गड येथे संत -महंत, गडाची विश्वस्त मंडळी यांच्या उपस्थितीमध्ये आज गडाचे दहावे उत्तराधिकारी म्हणून महं संभाजी महाराज यांची निवड करण्यात आली असून निवड करण्यात आली असून यानिमित्ताने हजारो भाविक भक्तांच्या साक्षीने गडावरती या कार्यक्रमाला या कार्यक्रमाचा मोठा सोहळा पार पडला आहे.**

महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री.क्षेत्र गडाने वर्षानुवर्ष समाज उद्धाराचे कार्य केले आहे. पंचक्रोशीतील भाविक भक्तांना या ठिकाणी अध्यात्माची शिकवणही मोठ्या अट्टाहासाने दिली जात आहे. यामुळे श्री क्षेत्र नारायण गड हे तीर्थक्षेत्र अध्यात्माच्या पटलावर गुरुस्थानी आहे. श्री.क्षेत्र नारायण गडाचे आठवे उत्तर अधिकारी (मठाधिपती) वै.महंत महादेव महाराज यांचे १९ जुलै २०११ रोजी वैकुंठगमन झाले होते. यावेळी गडाचे नववे उत्तराधिकारी कोण हा प्रश्न येथील विश्वस्त मंडळी सह पंचक्रोशीतील संत-महंत भाविक भक्तांना पडला होता. यातच धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायण गडाची वर्षानुवर्षे पायी वारी करणारे, गडावरती आणि आपल्या गुरु वरती निष्काम निष्ठाण ठेवणारे वारकरी म्हणून महंत शिवाजी महाराज यांचे नाव समोर आले होते. मागील काही वर्षापासून त्यांची वै.महादेव महाराज यांच्या सानिध्यामध्ये गडाची मोठी सेवा झाली होती. श्री क्षेत्र नारायण गडाचे निष्ठावंत वारकरी आणि वै. महंत महादेव महाराज यांचे शिष्य म्हणून शिवाजी महाराज यांच्याकडे पाहिले गेले आणि विश्वस्त समितीने गडाचे नववे मठाधिपती म्हणून महंत शिवाजी महाराज यांचे दि. २० जुलै रोजी २०११ रोजी नाव घोषित केले किंबहुना महंत शिवाजी महाराजांच्या हस्तेच वै. महादेव महाराजांचा समाधी सोहळा संपन्न झाला. या दिवसापासून महंत शिवाजी महाराज यांनी गडाचा चेहरा -मोहराच बदलून टाकला. श्री क्षेत्र नारायण गडावरती कोट्यावधी रुपयांचे विकास कामे झाली. गडाचे चोहीकडे

◀◀ पान २ वर



### “ नारायणगडची परंपरा संभाळून मी सेवा करीन- संभाजी महाराज

श्री.क्षेत्र नारायण गडाची उभ्या महाराष्ट्रामध्ये अध्यात्म आणि धर्म कार्याबद्दल ख्याती आहे. येथील परंपरेने प्रत्येकाशी सौजन्याने वागून समाज घडवण्याचे कार्य केले आहे. ही परंपरा सांभाळण्याची जबाबदारी आता महंत शिवाजी महाराज यांच्यासह ट्रस्ट समितीने माझ्यावर टाकली आहे. उपस्थित संत - महंत भाविक भक्त यांच्या साक्षीने माझ्या जीवनातील हा सर्वाधिक मोठा सोहळा आज पार पडत आहे. तुम्हा सर्वांच्या साक्षीने या ठिकाणी तुम्हाला शब्द देतो. गुरुवर्य महंत शिवाजी बाबांचा शब्द मी खाली पडू देणार नाही. आणि येथील परंपरेने गडाचे धार्मिक कार्य, आणि माजी सेवा समर्पित करत राहील असे अभिवचन यावेळी गडाचे नूतन उत्तराधिकारी संभाजी महाराज यांनी दिले आहे.

cmyk

अग्रलेख

# सरकारने आश्वासनांपासून पळच काढला

अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्याची त्यांची ही अकरावी वेळ होती. जेमतेम काही महिन्यांपूर्वीच विधानसभेच्या निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर सादर झालेला हा पहिला अर्थसंकल्प होता. निवडणुकातील जाहीरनाम्यात भरमसाठ घोषणा आणि आश्वासने देण्यात आली होती. त्याच्या पूर्ततेच्या दृष्टीने या अर्थसंकल्पात काय तरतुदी असतील याविषयी कमालीची उत्सुकता होती. पण अर्थसंकल्पाचे अजित पवारांचे भाषण ऐकल्यानंतर त्यांनी या जाहीरनाम्यातील सगळ्याच तरतुदींना रीतसर फाटा दिल्याचे स्पष्ट दिसते आहे.

शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी, वीज बिलात सूट, लाडक्या बहिणींना २१०० रुपये, बेरोजगारांसाठीची प्रशिक्षण योजना, कृषी मालाच्या बाजारभावाबाबतची भावांतर योजना, हमीभावाने कृषी माल खरेदी करण्यासाठी भरीव तरतूद अशा घोषणा या अर्थसंकल्पात अपेक्षित होत्या; परंतु या सर्व अपेक्षांना रीतसर फाटा दिला गेला आहे. लाडक्या बहिणींना पूर्वीप्रमाणेच पंधराशे रुपये आर्थिक मदत मिळेल, पण त्यांची एकवीसशे रुपयाची अपेक्षा पूर्ण होणार का हा सगळ्यात कळीचा मुद्दा होता, त्यावर अर्थमंत्र्यांनी भाष्य केले नाही. निवडणुकीच्या आधी विविध जातींना खूश करण्यासाठी त्यांच्यासाठी अनेक स्वतंत्र महामंडळे घोषित करण्यात आली. त्या महामंडळामार्फत भरीव आर्थिक मदत व्हावी अशी अपेक्षा होती, पण अर्थमंत्र्यांनी याबाबत कोणतीही घोषणा केली नाही. केवळ या १८ महामंडळाच्या योजना एकत्रित आणण्यासाठी स्वतंत्र वेबसाइट सुरू करण्याची अत्यंत किरकोळ घोषणा यात केलेली दिसली, या महामंडळाच्या आर्थिक तरतुदींबाबत मात्र अजित पवारांनी सोयीस्कर मौन बाळगले. महाराष्ट्र सरकारवरचा कर्जाचा बोजा पाहता यावेळी राज्य सरकारकडून फार चमकदार अर्थसंकल्प सादर होईल अशी अपेक्षा नव्हतीच. पण निदान निवडणुकीतील घोषणांच्या पूर्ततेच्या दृष्टीने काहीतरी हालचाली यात होतील असे मात्र अपेक्षित होते, पण त्यालाही रीतसर वाटाण्याच्या अक्षता लावल्या गेल्या.

विधानसभा निवडणुकीच्या आधी महायुतीच्या वतीने राज्यातील जनतेला जी जी आश्वासने देण्यात आली होती त्यावर तब्बल ९६ हजार कोटी खर्च होतील असा अंदाज होता, त्या खर्चालाही फाटा देऊन अर्थमंत्र्यांनी या आश्वासनांपासून सध्या तरी पळच काढलेला दिसतो. अर्थमंत्र्यांचे भाषण ऐकताना त्यांनी शाब्दिक फुलोरा चांगला सजवला होता. अनेक भव्य दिव्य योजनांचा उल्लेख त्यांनी केला, पण त्या विषयीच्या तरतुदींचा कोणताही उल्लेख आढळला नाही. अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांची कामे सध्या सुरू आहेतच, त्या कामांच्या पूर्ततेसाठी अर्थसंकल्पात तरतूद करणे आवश्यकच होते. त्यानुसार या तरतुदी केल्या गेल्या असल्या तरी त्यात नवीन असे काही नाही. मुंबई शहरासाठी ६४ हजार कोटी रुपयांच्या काही योजना जाहीर झालेल्या आहेत. पण यातील बहुतांश योजना खूप आधीपासूनच सुरू आहेत, असे उद्धव ठाकरे यांचे म्हणणे आहे. तथापि, अर्थसंकल्पाचे भाषण ऐकणाऱ्यांना मात्र अजित पवार काहीतरी भव्य दिव्य करायला निघाले आहेत असा आभास निश्चित निर्माण झाला. अर्थसंकल्पात सादर झालेल्या अनेक योजनांपैकी बऱ्याच योजना पुढच्या पाच-दहा वर्षांत पूर्ण व्हायच्या आहे; परंतु त्याचा आजच उल्लेख करत अर्थसंकल्पाला भव्यता देण्याचा कसोशीचा प्रयत्न अजित पवार यांनी केला आहे.

अर्थसंकल्पातील तूट प्रचंड प्रमाणात वाढली आहे. कर्जाचा बोजाही प्रचंड वाढला आहे. सरकारचे या कर्जाच्या व्याजावर दरवर्षी ५६ हजार कोटी रुपये खर्च होतात, पेन्शनवर ७४ हजार कोटी रुपये खर्च होतात, पगारावर १ लाख ६९ हजार कोटी रुपये खर्च होतात, असे सगळे सक्तीच्या खर्चाचे आकडे आहेत. त्यातच लाडकी बहीण योजनेसाठी तब्बल ३६ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत. या सगळ्या आवश्यक खर्चाच्या तुलनेत राज्याचे उत्पन्न मात्र तितक्या प्रमाणात वाढताना दिसत नाही. असे असतानाही अजित पवार यांनी करांचा फार मोठा बोजा राज्यातील नागरिकांवर टाकलेला नाही हीच त्यातल्या त्यात दिलासाजनक बाब म्हणता येईल. दरवर्षी महसूल वाढवण्यासाठी मद्यावरील उत्पादन शुल्कात वाढ होते, पण यावेळी उत्पादन शुल्कात वाढ करण्याचे अर्थमंत्र्यांनी टाळले आहे. चारचाकी वाहनांवरची जुजबी करवाढ सरकारने यात केली आहे. त्यामुळे एका अर्थाने खर्च आणि उत्पन्नाची होता होईल तो तोंडमिळवणी करणारा हा अर्थसंकल्प आहे.


अर्थसंकल्पात काहीतरी चमकदार घोषणा करणे अगदीच अनिवार्य असते. त्यामुळे संगमेश्वर येथे छत्रपती संभाजी महाराज यांचे भव्य स्मारक, आग्रा येथे शिवरायांचे स्मारक, पानिपत येथे मराठा सैन्याच्या शौर्याचे स्मारक अशी स्मारके उभारण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. त्याखेरीज अन्यही स्मारकांच्या नावांच्या घोषणा या अर्थसंकल्पात आहेत, पण अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे जगाला हेवा वाटेल असे जे स्मारक होणार होते त्याचा नामोल्लेखही या भाषणात दिसला नाही.

अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री पद आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्यासाठी या अर्थसंकल्पात काय तरतुदी असतील याचीही उत्सुकता होती. त्यानुसार दोन महत्त्वाच्या घोषणा अजित पवार यांनी यात केल्या आहेत. पुणे ते शिरूर तसेच तळेगाव ते चाकण या दोन रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तेथे उन्नत मार्ग उभारण्याची महत्त्वाची घोषणा या अर्थसंकल्पात केली आहे. पुणे मेट्रोच्या काही विस्तारित मार्गाचा उल्लेखही केला आहे. अशा वेगळ्या काही घोषणा सोडल्या तर अर्थसंकल्प जेमतेमच होता.

# खोक्याचा आका धसच; खोक्या भाईसह धसांनाही सहआरोपी करा

## धनंजय मुंडेंच्या मदतीला भाऊ अजय मुंडे धावले; आईबद्दलचे आरोप निरर्थक





**परळी । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख खून प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या धनंजय मुंडेंच्या मदतीला त्यांचे चुलत भाऊ अजय मुंडे धावून आले आहेत. त्यांनी पत्रकार परिषद घेत आ. सुरेश धसांचा चांगलाच समाचार घेतला. आमच्यामध्ये कुठलाही कौटुंबिक कलह नाही. फक्त सनसनाटी निर्माण करण्यासाठी असे आरोप केले जात आहेत, सुरेश धस यांनी आमच्या धनंजय मुंडेंच्या आईबाबत केलेले आरोप बिनबुडाचे आणि निराधार आहेत. मुंडे कुटुंबीयांमध्ये आम्ही कोणीही धनंजय मुंडे यांच्या नाराज नाहीत. आम्ही सर्व कुटुंबीय भक्कमपणे धनंजय मुंडेंच्या पाठीशी आहोत, असेही ते म्हणाले.**

आ. सुरेश धस यांनी मुंडे कुटुंबाबात मोठे विधान केले होते. मुंडे कुटुंबात कलह असून धनंजय मुंडेंच्या आई या वेगळ्या राहतात, त्यांचे सर्व भाऊ नाराज असल्याचा सनसनाटी आरोप धसांनी केला होता. त्यानंतर धनंजय मुंडे यांच्या मदतीला त्यांचे चुलत भाऊ अजय मुंडे धावून आले. त्यांनी धसांचा चांगलाच समाचार घेतला. आमदार सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप देखील यावेळी मुंडे यांनी केले आहेत. पुढे बोलताना अजय मुंडे म्हणाले की, धस किती धुतल्या तांदळाचा आहेत हे दिसत आहे. त्यांचा खोक्या आज बाहेर पडलेला आहे. खोक्याचा आका कोण ? सुरेश धस म्हणतात की, तो साधा कार्यकर्ता आहे. असा साधा कार्यकर्ता दोनशे हरणं, मोरं कापून खातो.मग याच्या मागे सुरेश धस नसतील, हे कशावरून सांगता येईल. या खोक्याच्या मागे सुरेश धस १०० टक्के आहेत. या प्रकरणात त्यांनाही सहआरोपी केले पाहिजे, अशी मागणी अजय मुंडे यांनी केली आहे.

# संतोष देशमुख प्रकरणात आज पहिली मोठी सुनावणी

## सीआयडीच्या दोषारोपपत्रानंतर वाल्मिकसह आरोपींचे जबाब महत्त्वाचे ठरणार



**बीड । प्रतिनिधी**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला तीन महिने उलटून गेले आहेत. गुन्हे अन्वेषण विभागाने सादर केलेल्या दोषारोपानंतर समोर आलेल्या मारहाणीच्या फोटो आणि व्हिडिओ नंतर संपूर्ण राज्यभर संतापाची लाट उसळली .या प्रकरणात अद्याप एक आरोपी कृष्णा आंधळे फरार आहे. दोषारोपपत्रानंतर सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात केज जिल्हा व सत्र न्यायालयात बुधवारी (दि. १२ मार्च) रोजी पहिली सुनावणी होणार आहे. मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेले वाल्मिक कराड, सुदर्शन घुले, विष्णू चाटे, सुधीर सांगळे, प्रतीक घुले आणि जयराम चाटे या प्रमुख आरोपींचे जबाब महत्त्वाचे ठरणार आहेत. या आरोपींचे जबाब दोषारोप पत्रात जोडण्यात आलेले नाहीत. बुधवारी बंद लिफाफ्यामध्ये आरोपीचे जबाब न्यायालयात सादर होतील. तर खंडणी प्रकरणात आरोपी वाल्मीक कराड याचा जामीन अर्ज न्यायालयात दाखल केला जाण्याची शक्यता आहे.

सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांच्यासह संपूर्ण कुटुंबीयांची मागणी आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी या मागणीसाठी मस्साजोगमध्ये अन्नत्याग आंदोलन करण्यात आले होते.

### पहिली सुनावणी ठरणार महत्त्वाची

या प्रकरणात हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपींचे जबाब कोर्टासमोर सादर करण्यात येणार आहेत. गुन्हे अन्वेषण विभागाने सादर केलेल्या दोषारोप पत्राला हे जबाब पत्र जोडण्यात आले नव्हते. मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेले प्रमुख आरोपी वाल्मिक कराड, सुदर्शन घुले, विष्णू चाटे, सुधीर सांगळे, प्रतीक घुले आणि जयराम चाटे या आरोपींचे जबाब घेण्यात आले आहेत. साक्षीदारांचे १६४ प्रमाणे जबाब घेतले गेले आहेत मात्र अद्याप ते समोर आलेले नाहीत. बुधवारी न्यायालयात बंद लिफाफ्यामध्ये आरोपींचे हे जबाब सादर होतील. तर खंडणी प्रकरणात आरोपी असलेल्या वाल्मीकचा जामीन अर्ज न्यायालयात दाखल केला जाण्याची शक्यता आहे.

# पान १ वरून...

## हरभऱ्याचे भाव

आणि प्रक्रिया उद्योगही अडचणीत आले आहेत. आयातीला मुदतवाढ मिळाल्याने ३१ मेपर्यंत आणखी ४ ते ५ लाख टन पिवळा वाटाणा आयात होऊ शकतो. भारताला कॅनडातून मोठ्या प्रमाणात आयात होईल. तसेच रशिया, टर्कि, युक्रेन, लिथुआनिया, लॅटविया आदी देशांमधूनही आयात होऊ शकते. चीनने नुकतेच कॅनडामधून आयात होणाऱ्या पिवळा वाटाण्यावर १०० टक्के आयात शुल्क लावले आहे. त्यामुळे कॅनडाचा चीनकडे जाणारा पिवळा वाटणा भारतात येऊ शकतो, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

----------

## निवडणुकीसाठी महिला

तयार नाहीत. शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यायला तयार नाहीत. १९६२ पासून आजतायगत इतके बहुमत कोणत्याही सरकारला मिळाले नाही. लोकांनी विश्वास ठेवला पण त्याचा उपयोग नाही. निवडणुकीच्या तोंडावर लाडकी माझी बहिण आहे असे सरकारने सांगितले. रोज त्याची जाहिरात केली. लाडक्या बहिणीला खुलवून टाकले आणि ४६ हजार कोटींची तरतुद लाडक्या बहिण योजनेसाठी केल्याचे सांगितले. यंदाच्या अर्थसंकल्पात मात्र ३६ हजार कोटींचीच तरतूद केली. पहिल्या झटक्यात १० हजार कोटी रुपये कमी करण्यात आले आहेत. म्हणजे १० हजार कोटी रुपये मिळणाऱ्या महिला योजनेतून घरी जाणार हे स्पष्ट होत आहे. मागच्या वर्षी या योजनेवर ३३ हजार २३२ कोटी खर्च केले. त्यावरून मते घेतली. २१०० रुपये महिना करू असे आश्वासन दिले पण या अर्थसंकल्पात त्याचा पत्ताच नाही.

------------

## क्रीडा मंत्रालयाने भारतीय कुस्ती

तरी, ते केंद्र सरकारकडून दिलासा मिळण्याची वाट पाहत होते. क्रीडा मंत्रालयाने सुमारे १५ महिन्यांनंतर भारतीय कुस्ती महासंघावरील बंदी उठवली आहे. महासंघाच्या निलंबनामुळे कुस्तीगीरांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. यामुळे महासंघ आणि क्रीडा मंत्रालयात संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली होती.

----------

## सरकारची नजर आता

करण्याची जबाबदारी आहे. या संबंधी नियमांमध्ये काही बदल करण्यासाठी केंद्रालाही विनंती करण्यात येईल असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. जो काही नियम आहे त्याचे पालन होते की नाही हे पाहण्याची जबाबदारीही त्या ठिकाणच्या पोलिस निरीक्षकाची आहे. त्याने जर काम केले नाही तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मशिदींवरील भोंग्यावर कारवाई करण्यात यावी अशी याआधी अनेकदा मागणी करण्यात आली आहे. त्यावर मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही आवाज उठवला होता. त्यानंतर काही प्रमाणात भोंग्यावर कारवाई करण्यात आली होती. पण नंतर पुन्हा एकदा ही कारवाई थंडावल्याचे दिसून आले.

------------

## एकतर आम्ही जाणार

सरकार ठिकाणावर येणार नाही. सरकार निवडून येईपर्यंत किती पाया पडत होता. किती लाडक्या बहिणींना पैसे दिले. पण आता निकष लावून लाडक्या बहिणींची संख्या कमी करत आहे. सरकार गोरगरिबांना कळू देत नाही. शेवटी बहीण ही बहीण असते, त्यामुळे तिला आता का योजनेतून बाहेर काढले जात आहे, असेही जरांगे यावेळी म्हणाले. आता खूप ऊन आहे नाहीतर त्यांना आताच हिसका दाखवला असता. मागच्या वेळी मुंबईला गेलो आणि सुखरूप परत आलो. त्यांना तेव्हाच झटका दाखवला असता. आम्हालाही बघायचे आहे की, मंत्री कुठे राहतो, आमच्या गोरगरीब शेतकऱ्यांनी मुंबई बघावी की नाही? त्यांनाही पाहावी असे वाटते. आमचा मुंबईला जाण्याचा विचार आहे. परंतु मी सध्या काही त्याबद्दल तुम्हाला सांगणार नाही. माझा डाव सांगणार नाही, असे सांगत मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईला जाणार असल्याचा इशारा दिला आहे. पुढे बोलताना म्हणाले, आता डाव कसे टाकायचे? हे आम्हाला चांगले माहिती आहे. परंतु आरक्षण आम्ही घेणारच आहे. अजून थोडे थांबू, पण तयारी अशी करू की चारही बाजूंनी तुम्हाला जायला रस्ता मिळणार नाही. मुख्यमंत्र्यांनी हे लक्षात ठेवावे, असा एल्गार मनोज जरांगे पाटील यांनी केला.

----------

## सर्व राष्ट्रीय अन् राज्य

आयोगाच्या परिषदेत, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशांच्या सीईओ, डीईओ आणि ईआरओएसना राजकीय पक्षांशी नियमित संवाद साधण्याचे निर्देश दिले होते. राजकीय पक्षांकडून प्राप्त झालेल्या कोणत्याही सूचनांचे कायदेशीर चौकटीत काटेकोरपणे निराकरण करण्याचे आणि ३१ मार्च २०२५ पर्यंत आयोगाला कृती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. आयोगाने राजकीय पक्षांना विकेंद्रित सहभागाच्या या यंत्रणेचा सक्रियपणे वापर करण्याचे आवाहनही केले असल्याचे आयोगाने निवेदनात म्हटले आहे. निवडणूक प्रक्रियेच्या २८ भागधारकांपैकी राजकीय पक्ष हे एक प्रमुख भागधारक आहेत. लोकप्रतिनिधी कायदा १९५० आणि १९५१, मतदार नोंदणी नियम १९६०; निवडणूक नियमांचे आचरण १९६१, सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणि भारतीय निवडणूक आयोगाने वेळोवेळी जारी केलेल्या सूचना, नियमावली आणि हस्तपुस्तिका यानुसार मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका घेण्यासाठी एक विकेंद्रित, मजबूत आणि पारदर्शक कायदेशीर चौकट स्थापित केली आहे, असे आयोगाने म्हटले आहे. दरम्यान, विरोधी पक्षाकडून देशातील निवडणूक प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

-----------

# इयत्ता १० वी व १२ वी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुणासाठी अर्ज करा

**जालना । प्रतिनिधी**

**सन २०२४-२५ यावर्षीपासून इयत्ता १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ग्रेस गुणाचे अर्ज शासनाच्या आपले सरकार पोर्टलवरती ऑनलाईनद्वारे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे.**

त्याअनुषंगाने जालना जिल्ह्यातील जिल्हा/ विभाग/ राज्य/ राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील पात्रता धारक खेळाडू विद्यार्थ्यांचे ग्रेस गुणाचे अर्ज जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले सरकार पोर्टलवरती ऑनलाईनद्वारे भरावयाचा आहे. जालना जिल्ह्यातील कोणत्याही खेळाडूचा ग्रेस गुणाचा अर्ज जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून ऑफलाईन पध्दतीने स्वीकारला जाणार नाही. आपले सरकार पोर्टवरीती ऑनलाईनद्वारे अर्ज करण्यापासून खेळाडू विद्यार्थी वंचित राहिल्यास त्याच्या शैक्षणिक नुकसान भरपाईस सदर मुख्याध्यापक/ प्राचार्य जबाबदार राहतील यांची गांभीर्याने नोंद घ्यावी. त्यानुसार जिल्ह्यातील सदर मुख्याध्यापक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील खेळाडू विद्यार्थ्यांनी दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईनवर ग्रेस गुणाचे अर्ज करण्यात यावे असे आवाहन संजय गाढवे जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यामार्फत करण्यात आले.

# धमकीच्या ऑडिओ क्लिपमधला आवाज माझाच-आ.संदीप क्षीरसागर

## तहसिलदार धमकी प्रकरणी स्पष्टीकरण; अधिकाऱ्याने बदमाशी केल्याचा आरोप



**बीड । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख हत्या प्रकरण उचलून धरल्याने मला टार्गेट केले जात आहे, असे बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी म्हंटले आहे. अधिकाऱ्यानी बीडच्या अनेक जमिनीच्या प्रकरणात बदमाशी केली आहे. ऑडिओ क्लिप मधला आवाज माझाच आहे, असेही क्षीरसागर यांनी म्हंटले आहे.**

आ. संदीप क्षीरसागर यांची एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली असून नायब तहसीलदारांना ते फोनवरुन धमकी देत असल्याचे ऐकायला मिळत आहे. आता, आमदार क्षीरसागर यांनी या व्हायरल क्लिपवर आपली प्रतिक्रिया दिली असून ही क्लिप दीड वर्षांपूर्वीची आहे. त्यावर क्षीरसागर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तो आवाज माझाच आहे. अशा बादमाश अधिकाऱ्याची आरती केली पाहिजे का? असा उलट प्रश्न त्यांनी केला आहे. आपल्या पदाचा हा अधिकारी दुरुपयोग करतो. माझ्याकडे पुरावे आहेत. मात्र आता संतोष देशमुख हत्या प्रकरण मी उचलून धरल्याने मला टार्गेट केले जात असल्याचे यावेळी संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

# बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्तीसाठी माजलगावात प्रचंड निदर्शने आंदोलन

**माजलगाव। प्रतिनिधी**

बिहार येथील बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन भारत देश भर जोर धरलेला असताना माजलगाव जिल्हा बीड येथे बुद्धगया महाबोधी महाविहार ब्राह्मणांच्या ताब्यातून मुक्त करून ते बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावी या मागणीसाठी माजलगाव तहसील कार्यालय समोर प्रचंड असे जोरदार निदर्शने करण्यात आली यामध्ये प्रमुख मागण्या बुद्धगया महाबली महाविहार हे ब्राह्मणांच्या वर्चस्वातून मुक्त करून बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे तसेच बी टी एस १९४९ बिहार बुद्धगया टेम्पल ॲक्ट रद्द करा कारण या बी टी एस १९४९ कायद्यामुळे भारतीय कायद्यानुसार जे प्रत्येक धर्माला आपापल्या धर्माचे आचरण अनुकरण प्रचार प्रसार करण्याचा जो हक्क अधिकार दिलेला आहे तो हक्क अधिकार नष्ट होऊन बी टी एस कायद्यामुळे बुद्ध विहार कमिटीवर चार बौद्ध चार ब्राह्मण व त्या कमिटीचा पदसिद्ध अध्यक्ष हा बुद्धगया येथील जिल्हाधिकारी हे असतील आणि आतापर्यंत चे जिल्हाधिकारी हे शक्यतो ब्राह्मण किंवा हिंदू धर्मीय राहत आलेले आहे त्यामुळे या बौद्धांचे चार व ब्राह्मणांचे चार आणि अध्यक्ष एक ब्राह्मण असे मिळून त्यांचाच त्या कमिटीवर कब्जा आहे म्हणून हा कायदा रद्द करून संपूर्ण ट्रस्ट कमिटी ही बौद्ध भिक्षूंच्या किंवा बौद्ध धर्मीयांच्या ताब्यात देण्यात यावे या व इतर मागण्यांसाठी आज दिनांक ११/३/२०२५ रोजी निदर्शने आंदोलन करण्यात आले यावेळी भंन्ते शरनानंद महाथेरो,भंन्ते पय्यातीस महाथेरो,भंन्ते पेंडोल यांच्यासह या धरणे आंदोलनाला बुद्धगया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष विजय साळवे, उपाध्यक्ष पांडुरंग जाधव,सचिव कचरू खळगे,कोषाध्यक्ष राजकुमार सोनवणे,संघटक के.व्ही.साळवे, सल्लागार दयानंद स्वामी, बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे, राष्ट्रवादीचे नेते तथा छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मोहनराव जगताप, चिंचगव्हाणचे सरपंच राज अर्जुन, कॉंग्रेस अनुसूचित जाती मोर्च्याची जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी या आंदोलनास पाठिंबा दिला तर चर्मकार समाजाची नेते नानासाहेब घोडके,उद्योजक पद्माकर कांबळे, राजेश जाधव यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित होते तसेच बुद्धगया महा पोथी महाविहार बचाव कृती समितीचे अध्यक्ष विजय साळवे यांनी सांगितले की सोशल मीडियावर एका सुज्ञ बुद्ध उपासकाचा मेसेज आला आणि यशोधरा बुद्ध विहार फुलेनगर माजलगाव येथे बुद्धगया महाविहार मुक्त करण्यासाठी आंदोलन करण्यासाठी एका बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगून या बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन



त्याप्रमाणे ज्यांना ज्यांना बौद्ध धम्मा विषयी असता आहे ते प्रमुख कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित राहिले व अचानकपणे मला या बुद्धगया महाविहार बचाव आंदोलन कृती समितीचा अध्यक्ष करण्यात आले बंधू आणि भगिनींनो भारताच्या इतिहासामध्ये आपण बघितले तर असे लक्षात येते की जगातील महान सम्राट राजा अशोकाने कलिंग चं युद्ध जिंकून ते सम्राट अशोक हे चक्रवर्ती सम्राट झाले आणि त्यांनी कलिंगाच्या युद्धातील नरसाहार मनुष्याचे हानी बघून बुद्धाचा आयुष्याचा मार्ग स्वीकारला आणि त्यानंतर आपल्या पूर्ण राज्यकारभारात राजअश्रय बौद्ध धम्माला देऊन धर्माच्या प्रचाराने प्रसारासाठी कृषीने प्रयत्न केले व जिथे तथागत भगवान गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली संबोधि प्राप्त झाली त्या बिहार येथील गया या ठिकाणी प्रचंड असे सुंदर असे बुद्ध विहार बांधण्यात आले त्याचबरोबर सम्राट अशोकाने त्यांच्या राज्यकारभार चालू असताना संपूर्ण राज्यामध्ये ८४ हजार बुद्ध विहार स्तूप स्तंभ उभारले ते आता कुठेही दिसत नाही मग ते गेले कुठे आता जे भारतातीलच नव्हे तर जगातील बौद्धांचे श्रद्धास्थान आहे ते बुद्धगया महाबोधी महाविहार धंदेवाईक ब्राह्मणांनी ताब्यात घेऊन त्या बुद्धविहाराचे विद्रोपीकरण करण्यात येत आहे जिथे सारनाथ या ठिकाणी भगवान बुद्धांनी आपल्याला प्राप्त झालेली ज्ञान ज्या पंचवर्गीय भिक्षुंना दिले होते ते पाच शिष्य पुढे चालून भिक्षु होऊन बुद्धाच्या शिकवणीचा प्रचार आणि प्रसार करू लागले त्या पंचवर्गीय भक्षण च्या जागी त्यांचे विद्युतीकरण करून तेथील पंडित ब्राह्मण हे त्या पाच भिक्षूंना पाच पांडव सांगत आहेत अशा पद्धतीने विविध बुद्धाच्या मुर्त्यांची विद्रूपीकरण चालू आहे जर हे असेच राहिले तर ८४ हजार बुद्ध विहार स्तूप स्तंभ जसे इथल्या ब्राह्मणांनी ताब्यात घेतले व त्यांना इतर धर्मियांची नावे दिली तशी या बुद्धगयाला सुद्धा पुढे चालून संपूर्ण कब्जा घेतील म्हणून आता वेळ आली आहे आपण हे बुद्धगया महाविहार वाचविण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत विविध आंदोलने करणार आहोत सुरुवातीला आपण निवेदने दिली आज निदर्शने केली आता मोर्चे काढून उपोषण करू रास्ता रोको करू असे वेगवेगळ्या पद्धतीने बुद्धगया बुद्ध विहार मुक्त झाल्याशिवाय हे आंदोलन थांबणार नाही आणि याचा परिणाम बीड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण भारतभर या आंदोलनाचा परिणाम होऊन देशातील सर्व बौद्ध रस्त्यावर उतरत आहेत याप्रसंगी धम्मचारी अमोलरत्न,राहुल टाकणखार,डॉक्टर श्रीराम खळगे, दिलीपराव मकसरे,धम्मानंद साळवे, सदाशिव भालेराव, अंकुशराव जाधव, कमलताई डोंगरे,बी एन जाधव,प्रभाकर साळवे,सिद्धार्थ सोनपसारे, कमलताई डोंगरे, शांताबाई रंगनाथ, साळवे लीलाताई, उजगरे जी एन, घनघाव बी.सी, डोंगरे एल आर, मस्के प्रा.धम्मानंद बोराडे,अविनाश जावळे,किशोर जावळे यासह मोठ्या प्रमाणात बौद्ध उपासक उपाशीका उपस्थिती

## नारायणगडाचे दहावे उत्तराधिकारी

बाजूने बांधकाम झाल्यामुळे श्री क्षेत्र नारायण गड हा केवळ बीड जिल्ह्यातच नव्हे तर उभ्या महाराष्ट्रामध्ये भगवा झेंडा फडकून आपला नावलौकिक वाढवू लागला. महंत शिवाजी महाराजांच्या हस्ते विविध विकास कामे तर झालीच परंतु धार्मिक आणि अध्यात्मिक कार्यक्रमाला ही मोठी गती व व्यापकता प्राप्त झाली आहे. या ठिकाणचे नारळी सप्ताहसह, पार पडणारे विविध सोहळे आकाशाला गवसणी घालत असतात. गडाचे कार्य हे अबाधित मोठ्या नेटाने पार पडावे यासाठी महंत शिवाजी महाराज यांनी विश्वस्त समितीला विश्वासात घेऊन मादळमोही येथील जगद्गुरु तुकाराम महाराज संस्थानचे मठाधिपती महंत संभाजी महाराज यांची गडाचे उत्तराधिकारी म्हणून निवड केली होती. काही कुणकुण कानी पडत असायची. आज ही कुणकुण सत्या उतरली असल्याचे पहायला मिळत आहे. तसे संभाजी महाराज ही वर्षानुवर्षे नारायण गड हा आपला गुरुस्थान आपली सेवा समर्पित करत आले आहेत. म्हणूनच या ठिकाणी गडाचे दहावे उतराधिकारी म्हणून महंत संभाजी महाराज यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आज गडावरती श्री. नगद नारायण महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा प्रति वर्षाप्रमाणे याही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला याचे औचित्य साधून गडाचे दहावे उत्तराधिकारी म्हणून संभाजी महाराज यांच्या गळ्यामध्ये पुष्पमाला टाकण्यात आली. यावेळी महंत शिवाजी महाराज, महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, जनार्दन महाराज शिंदे, महंत मधुकर महाराज गवारे, प्रकाश महाराज बोधले, सत्यवान महाराज लाटे, नाना महाराज कदम,आदी संत -महंतासह विश्वस्त समितीचे सचिव ॲड. महादेव तुपे, दिलीप गोरे,जे.पी. शेळके सर,गोवर्धन काशीद सर, राजेंद्र मस्के, बळीराम गवते ही सर्व विश्वस्त मंडळी सह श्री क्षेत्र नारायण गडाचे सर्व टाळकरी, गुणवान मंडळी व हजारोच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते .या कार्यक्रमानंतर महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे श्री.नगद नारायण महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त किर्तन ही पार पडले व आलेल्या भाविक भक्तांना या ठिकाणी महाप्रसादाची पंगती देण्यात आली आहे.

# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. १२ मार्च २०२५



## हातडी शाळेत माता पालक मेळावा साजरा

**परतूर । प्रतिनिधी**

जि.प.प्रा.शाळा हातडी ता.परतूर येथे शाळेच्या प्रांगणामध्ये माता पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये गावातील माता पालक भगिनी खूप मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. माता पालक मेळावा आयोजन करण्याचे प्रयोजन म्हणजेच विद्यार्थी-शिक्षक आणि पालक यांच्यामध्ये योग्य तो सुसंवाद निर्माण व्हावा व त्यांच्या विचारांची देवाण-घेवाण व्हावी. हेच उद्दिष्ट ठेवून या पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून गावच्या सरपंच श्रीमती.रेणुकाताई झरेकर या उपस्थित होत्या,तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच श्रीमती.मीनाताई गाढवे,कु.ठाकुर मॅडम(आरोग्य कर्मचारी),श्रीमती.गाढवे मॅडम(आरोग्य कर्मचारी), श्रीमती.डॉ.अनुजा बिनगे ( गोरे) मॅडम, श्रीमती.सुचिता कुलकर्णी मॅडम(स.शि.) ह्या लाभल्या होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. त्यानंतर अध्यक्ष व प्रमुख पाहुणे व सर्व माता पालक यांचे स्वागत पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती. अंबुलगे मॅडम यांनी केले.अध्यक्ष व प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. यामध्ये कुलकर्णी मॅडमनी मुलांना अभ्यास कसा करावा याबद्दल माहिती सांगितली. बिनगे मॅडमनी मुलींनीं त्यांचा आहार व शारीरिक काळजी घेण्याबद्दल मार्गदर्शन केले. ठाकूर मॅडमने मुलींना मासिक पाळी व गर्भाशयाचे कॅन्सर याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. आरोग्याची काळजी घेण्याबाबत सर्व माता पालकांमध्ये व किशोरवयींन मुलींमध्ये जागृती निर्माण केली. तसेच गाढवे मॅडम यांनी सुद्धा आपले अनुभव व्यक्त केले.

# कै. संतोष देशमुख कुटुंबीयांना माजलगावकरांकडून पन्नास लक्ष रूपयांची आर्थिक मदत -आ. प्रकाश सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात मस्साजोग याठिकाणी सरपंच संतोष देशमुख यांची निर्घुण, निर्दयी हत्या करण्यात आली होती. या घडलेल्या निंदनीय व निष्ठुर घटनेचे पडसाद व शोककळा संपुर्ण बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात पसरली होती. या निर्दयी हत्येनंतर कै. संतोष देशमुख यांचे कुटूंब ? उघड्यावर पडू नये, किमान त्यांना थोडी आर्थिक मदत होउन जिवन जगण्यासाठी थोडा - फार हातभार लागावा या उदात्त हेतुने आ. प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव तालुक्यासह वडवणी व धारूर तालुक्यात मदत फे-या काढुन निधी संकलन करण्यात आले होते.ही मदत साधारण पन्नास लक्ष ३२ हजार ८८६ रूपये एवढी जमा झाली होती. ही जमा झालेली संपुर्ण रक्कम दि. १० मार्च सोमवार रोजी कै. संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांना पुर्णतः सोपविली असुन भविष्यामध्येही माजलगाव विधानसभा मतदारसंघ हा संतोष देशमुख यांच्या परिवाराच्या सोबत कायम राहिल असा विश्वास आ. प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केला.



माजलगाव तालुका हा तसा अतिशय भावनिक व संवेदनशील तालुका आहे. कोणत्याही कुटुंब अथवा व्यक्तीवर संकट कोसळल्यावर तन, मन, धनाने धावुन जाणारे मानसं या मतदार संघात राहतात. यापुर्वीही कोल्हापुर येथील जवान चंद्रशेखर मोरे यांचे माजलगावच्या धरणात मतदकार्य करत असतांना निधन झाले होते. तेंव्हाही अशीच शोककळा माजलगाव तालुक्यात पसरली होती. त्यावेळी सुध्दा माजलगाव विधानसभा मतदारसंघातील समाजातील सर्व घटकांनी एकत्रित येउन आर्थिक निधी संकलन करत साधारणतः ५६ लक्ष रूपयांची आर्थिक मदत जवान चंद्रशेखर मोरे यांच्या कुटूंबीयांना कोल्हापुर येथे जावुन तात्कालिन पालकमंत्री व तत्कालिन जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत मोरे कुटूंबीयांकडे सुपुर्त करण्यात आला होता. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे संवेदनशील आमदार प्रकाश सोळंके यांनी तात्काळ देशमुख कुटूंबीयांची भेट घेवुन आल्यानंतर तेथील परिस्थिती पाहता माजलगाव येथे एका व्यापक बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत सर्वपक्षीय नेते, संघटना पदाधिकारी, रोटरी क्लब, पत्रकार, व्यापारी महासंघ सर्वच संघटना एकत्र आल्या होत्या.यामध्ये आ. सोळंके यांनी देशमुख कुटूंबातील सरपंच कर्ते पुरूष होते.त्यांची निर्घुण हत्या झाली. हत्यारांना फाशी होईल यात वाद नाही परंतु सद्यःपरिस्थितीत त्या कुटूंबाला आधार म्हणुन निश्चीत मदतीची गरज आहे. तेंव्हा आपण सर्वांनी एकत्रीत येउन मदफेरी काढु असे आवाहन केले. या मदतफेरीत शाळेतील मुलांनी खाउसाठी ठेवलेल्या पैशांतुन व भाजीविक्रेत्यांनी सुध्दा आपल्या यथाशक्तीतुन आर्थिक मदत केली तर आ. सोळंके यांनी दहा लक्ष रूपयांची भरीव आर्थिक मदतही या मदतीत दिली. माजलगाव तालुक्यासह धारूर आणि वडवणी तालुक्यातुन सुध्दा सर्व राजकीय नेते, संघटनांनी एकत्रीत येवुन गावो - गाव मदतफे-याकाढुन मदतनिधी मदफेरी खात्यात जमा केला.दरम्यान माजलगाव मतदारसंघातील संवेदनशील जनतेने आ.सोळंके यांच्या आवाहनाला प्रतिसाद देउन कै. संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांना जी आर्थिक मदत केली त्याबद्दल प्रकाश सोळंके यांनी भावनिक होउन आपल्या भावना व्यक्त केल्या.

## रोटरी होकेशनल अॅवार्ड पुरस्काराने रमाकांत पाटील, रविंद्र देवरवाडे, विद्या रूद्राक्ष सन्मानित

**अंबाजोगाई – प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ सिटी यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणार्या व्यक्तींना

रोटरी होकेशनल ऑवार्ड या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षी ज्येष्ठ पत्रकार रमाकांत पाटील प्रयोगशिल शेतकरी रविंद्र देवरवाडे तर महिला उद्योजक विद्या रूद्राक्ष यांना रोटरी होकेशन ऑवार्ड पुरस्काराने रविवारी सन्मानित करण्यात आले.प्रांतपाल सुरेश साबु, उपप्रांतपाल हेमंत रामढवे, रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे,



सचिव धनराज सोळंकी यांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी ज्येष्ठ पत्रकार रमाकांत पाटील हे गेल्या ३३ वर्षापासुन पत्रकारीतेत कार्यरत आहेत. त्यांच्या माध्यमातून समाजातील अनेक रखडलेल्या प्रश्नांना न्याय मिळाला.प्रयोगशिल शेतकरी रविंद्र देवरवाडे यांनी गटशेती, महिला गटशेती व सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून शेतीमध्ये विविध प्रयोग केले. तर विद्या रूद्राक्ष यांनी महिला उद्योजक म्हणून शेतीतील पिकांपासुन प्रक्रिया उद्योग सुरू केले. तसेच वृक्ष लागवड व विविध घरगुती उद्योग यांच्या या कार्याची दखल घेवून त्यांना रोटरी होकेशनल ऑवार्ड या पुरस्काराने शाल, श्रीफळ, स्मृती चिन्ह व सन्मानपत्र देवून सन्मानित करण्यात आले. सन्मानपत्राचे वाचन गणेश लोमटे यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश सोनवळकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार धनराज सोळंकी यांनी मानले. या कार्यक्रमास रोटरी क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## देशमुख प्रतिष्ठानचं कार्य प्रेरणादायी –तहसीलदार हेमंत ढोकले

**कळंब । प्रतिनिधी**

येथील देशमुख प्रतिष्ठानच्या वतीने गेल्या दहा वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवा निमित्त शालेय विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व, निबंध ,चित्रकला इत्यादी स्पर्धा घेऊन दरवर्षी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येते. यावर्षी शिवजयंती निमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेतील यशवंत विद्यार्थ्यांना श्री हेमंत ढोकले तहसीलदार कळंब, प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. रमेश जाधवर ह भ प महादेव महाराज आडसूळ, अखिल भारतीय साहित्य परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष परमेश्वर पालकर,प्रतिष्ठानचे अध्यक्ष अॅड दिलीपसिंह देशमुख, माजी नगराध्यक्ष यशवंत दशरथ,प्राचार्या लता यंदे , शिवसेना उबाठा गटाच्या शहरप्रमुख धनश्री कवडे या मान्यवरांच्या शुभहस्ते ७४ विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना तहसीलदार हेमंत ढोकले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अतुलनीय कार्याचा प्रेरणादायी इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडला. अभ्यासात कष्ट व सातत्य ठेवून आपण छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श



डोळ्यासमोर ठेवून भविष्याचे उत्तम उत्तम नागरिक बनाल अशी अपेक्षा विद्यार्थ्याकडून व्यक्त केली. गेल्या दहा वर्षापासून शिवजयंती निमित्त देशमुख प्रतिष्ठानच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाचे कौतुक करत देशमुख प्रतिष्ठानचे कार्य हे समाजासाठी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शक आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमांमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाथर्डी , जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आढाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सात्रा, लता मंगेशकर विद्यालय कळंब, मॉडेल इंग्लिश स्कूल कळंब या शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग होता. याप्रसंगी देशमुख प्रतिष्ठानच्या वतीने या गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या श्री राजेंद्र बिक्कड, राजेंद्र पवार, महादेव खराटे ,ऋषी कुमार साबळे, गजानन पाटील ,वाघमारे सर सरोजिनी पोते, मनीषा पवार, लता यंदे या शिक्षकांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाचे आयोजक अॅड. दिलीपसिंह देशमुख ,सूत्रसंचालन प्रसिद्ध शिवव्याख्याते महादेव खराटे तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रतिष्ठानचे सदस्य श्री पांडुरंग गुरव श्री अॅड.पृथ्वीराज देशमुख ,मॉडल इंग्लिश स्कूलचे शिक्षक वृंद व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## मराठवाडा साहित्य परिषद, शाखा अंबाजोगाईची नूतन कार्यकारिणी जाहीर

### अध्यक्षपदी डॉ.राहुल धाकडे, उपाध्यक्षपदी प्रा.डॉ.शैलजा बरूरे तर सचिवपदी गोरख शेंद्रे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील मराठवाडा साहित्य परिषद, शाखा अंबाजोगाईची नूतन कार्यकारिणी सोमवारी जाहीर करण्यात आली आहे. नूतन कार्यकारिणी सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी कार्यरत राहणार आहे. यात सर्वानूमते डॉ.राहुल धाकडे (अध्यक्ष), प्रा.डॉ.शैलजा बरूरे (उपाध्यक्ष), मंजुषा कुलकर्णी (कोषाध्यक्ष), गोरख शेंद्रे (सचिव) आणि भागवत मसने (सहसचिव) असणार आहेत. या कार्यकारिणीत सदस्य म्हणून विद्याधर पांडे (मुकुंदराज कवी संमेलन), अनिरूद्ध चौसाळकर (मासिक मैफल), प्रा.सतीश घाडगे (विशेष उपक्रम), प्रा.संतोष मोहिते (प्रसिद्धी व तंत्रज्ञान), प्रा.रोहिणी अंकुश (भाषा दिन), प्रा.डॉ.कल्पना बेलोकर-मुळावकर (दिन विशेष) आणि निमंत्रित म्हणून अमर हबीब (मार्गदर्शक), तिलोत्तमा पतकराव (महिला तसेच स्पर्धा) या सोबतच पदसिद्ध म्हणून दगडू लोमटे (केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व माजी अध्यक्ष), बालाजी सुतार (११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे अध्यक्ष), सुदर्शन रापतवार (११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष), अनिकेत लोहिया (नियोजित दुसऱ्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष) यांचा समावेश



आहे. नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकारिणीचे शहरातील साहित्य वर्तुळातून स्वागत होत आहे.

अध्यक्षपदी डॉ.राहुल धाकडे : विद्यार्थी दशेपसूनच डॉ.राहुल धाकडे हे आंबेडकरी चळवळ, सम्यक विद्यार्थी आंदोलन ते एक उपासक म्हणून सामाजिक धम्म चळवळी मध्ये सक्रिय सहभाग घेऊन तन-मन-धनाने काम करणारे कार्यकर्ते आहेत. मानवतावाद हा एकच धर्म असे मानून त्या मानवतेसाठी काम करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ.धाकडे ओळखले जातात. इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीचे ते सदस्य आहेत. यापूर्वी आशा आयसीयूच्या माध्यमातून त्यांनी बांधिलकी जोपासत गरजूंना दर्जेदार रूग्णसेवा दिली आहे. शिक्षक दिनानिमित्त ते अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने शिक्षक अवार्ड प्रदान करतात. ते एक ऑल राऊंडर, अभ्यासू, मनमिळाऊ, शांतसंयमी, कुशल संघटक, सामाजिक कार्यात अग्रेसर, हजारो रूग्णांना जीवनदान देणारे प्रसिद्ध छातीविकार तज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन (ॲम्पा) या अंबाजोगाई तालुक्यातील सर्व वैद्यकीय शाखा सर्व डॉक्टरांच्या संघटनेची स्थापना केली. पहिली कार्यकारणी बिनविरोध निवडण्यात आली. अध्यक्ष म्हणून डॉ.राहुल धाकडे यांची निवड करण्यात आली. या माध्यमातून त्यांनी आयपीएलच्या धर्तीवर ॲम्पा क्रिकेट कप स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले आहे. तसेच डॉक्टर्स बांधवांसाठी ते सर्व सन्माननिय डॉक्टर्स बंधू-भगिणी यांना सोबत घेऊन असेच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित आहेत. यासोबतच अंबाजोगाईत मातोश्री रमाई आंबेडकर जयंती महोत्सवाची सुरूवात केली, तसेच बुध्दीस्ट फौंडेशन ऑफ इंडिया यांच्या माध्यमातून भव्य धम्म महोत्सवाचे आयोजन करणारे डॉ.धाकडे हे भीम जन्मभूमी, राष्ट्रीय स्मारक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल सोसायटी, डॉ.आंबेडकर नगर (मह.), मध्यप्रदेशचे कार्यकारणी सदस्य ही आहेत. डॉ.धाकडे यांनी यापूर्वी अंबाजोगाई साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्षपद भूषविले आहे. तसेच ते मराठवाडा साहित्य परिषद अंबाजोगाई शाखेचे यापूर्वी उपाध्यक्ष ही होते. मराठी भाषेचे विद्यापीठ अंबाजोगाई येथे व्हावे यासाठीच्या पाठपुराव्यामध्ये त्यांचा ही सहभाग राहिला आहे. शहरात साहित्यिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, प्रबोधनपर उपक्रम राबविण्यात डॉ.धाकडे यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण व सर्वंकष कामगिरीची दखल घेऊन सर्वानुमते डॉ.राहूल धाकडे यांची मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाईच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या अनुभवाचा व सातत्यपूर्ण कार्याचा फायदा मसाप शाखा अंबाजोगाईला होणार आहे. त्यांच्या निवडीबद्दल समाधान व्यक्त होत आहे.

पान ६ वरून...

### सरकारी मीडिया मॉनिटरिंग

आणि पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे साहेब यांच्या संकल्पनेनुसार सरकारला तहसीलदार यांच्या मार्फत बीड जिल्हाव वडवणी तालुका शाखेच्या वतीने सरकारच्या निर्णयाविरुद्ध निषेध करत निवेदन देण्यात आले. या निवेदनात पुढे म्हटले आहे की,पत्रकारितेचा मुख्य हेतू जनतेपर्यंत सत्य व वस्तुनिष्ठ माहिती पोहोचवणे हा आहे.मात्र, सरकारकडून या कामासाठी खासगी संस्था नेमण्याचा निर्णय घेतल्याने बातम्यांवर अप्रत्यक्ष सेन्सॉरशिप लादली जाण्याचा धोका आहे. हा निर्णय सरकारविरोधी मतप्रवाह दडपण्याचा आणि प्रसारमाध्यमांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते.देशाच्या लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि पत्रकारितेच्या स्वतंत्र भूमिकेचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई या निर्णयाला तीव्र विरोध करत आहे. सरकारने पारदर्शकता न ठेवता खासगी संस्थेला हे काम सोपवणे म्हणजे माध्यमांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न आहे. सरकार कडून लादली गेलेली ही अघोषित आणीबाणी त्वरित मागे घ्यावी असे निवेदन निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना मंगळवार दिनांक ११ मार्च रोजी देण्यात आले.सरकारने जर निर्णय मागे घेतला नाही तर उद्या बुधवार दि. १२ मार्च रोजी महाराष्ट्राचे संवेदशील आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते स्व. यशवंतराव चव्हाण (मा. मुख्यमंत्री) यांच्या जयंती दिवशी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई तर्फे राज्यव्यापी लेखणीबंद आंदोलन व निदर्शने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लेखणी बंद आंदोलन करणार आहोत. ही बाब पुरोगामी महाराष्ट्रात घडू नये, यासाठी आमच्या मागण्यांचा गांभीर्यपूर्वक विचार करून राज्य सरकारने खाजगी संस्थेमार्फत मीडिया मॉनिटरिंग करण्याचा घेतलेला निर्णय त्वरित मागे घ्यावा.अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे बीड जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव, वडवणी तालुका अध्यक्ष अशोकराव निपटे,शांतीनाथ जैन तालुका उपाध्यक्ष, अर्जुन मुंडे तालुका सचिव, शंकर झाडे ता.कोषाध्यक्ष, सतिष राव मुजमुले डिजिटल मिडिया वडवणी तालुका अध्यक्ष,शेख एजाज ता.उपाध्यक्ष, अशोकराव फपाळ ता.सचिव, अंकुश गवळी कोषाध्यक्ष, श्रीनिवास काकडे पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती वडवणी तालुका अध्यक्ष, ज्ञानेश्वर लंगे उपाध्यक्ष, गंगाभिष्म आंडील सचिव, शंकर जाधव कोषाध्यक्ष, विष्णु डोईफोडे सदस्य इत्यादी उपस्थित होते.

आज तहसील कार्यालयासमोर लेखणी बंद आंदोलन...

महाराष्ट्र राज्याचे पहिले माजी मुख्यमंत्री संवेदनशील आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीचे औचित्य साधून आज १२ मार्च २०२५ रोजी बीड तहसील कार्यालयासमोर पत्रकार संघाच्या वतीने निदर्शने करण्यात येऊन लेखणी बंद आंदोलन सकाळी ११:३० वाजता करण्यात येणार आहे. या आंदोलनामध्ये बीड जिल्ह्यातील व वडवणी तालुक्यातील पत्रकार बांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई बीड जिल्हा , वडवणी तालुका शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

### जिल्हा परिषद गोविंदपुर

अरूणा पांचाळ, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कुंडकर, मुख्याध्यापक सि. आर. परदेशी यांची उपस्थिती होती. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी गणेश वंदना, मी हाय कोळी, चिट्टीया कलिया, आमदार झाल्यासारखं वाटतंय, मेरे पापा, ओम साई राम, आम्ही शिवकन्या, खंडोबाची कारभारीन, नन्ना - मुन्ना राही हु यासह विवीध गाण्यातुन, नाटकातुन कलेचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वैष्णवी नागरगोजे, प्रतिक्षा आवळे यांनी केले. कार्यक्रमासाठी हरिभाउ गवते, अंगणवाडी ताई मंदाकिनी वैराळ, रूपाली गाडेकर, शिक्षीका बिसेन मॅडम यांचेसह शाळेचे सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


जा.क्र.म.प./अंबड नामांतर
कार्यालय नगर परिषद अंबड २०२५/१२६
दिनांक : ०६/०३/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री. सौ. श्रीमती १) सचिन ज्ञानदेव हराळे २) सुरेखा सचिन हराळे प्रकरण सर्वे नं ३८ सहान प्लॉट नं -५ न.प.मि.न १८-९५-५/२ चे हस्तांतर करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (५) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पुर्व - विक्रेता नं.१ शरद रामप्रसाद करवा यांचा न.प.मि.नं.१८-९५-५/१ आज रोजी राजेंद्र मसू ढोणे व उषा राजेंद्र ढोणे यांनी विक्री केलेला प्लॉट
पश्चिम :-रामेश्वर जाधव यांची प्लॉटींग
दक्षिण प्लॉट नं.६
उत्तर :- ६ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता,

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**


पान ६ वरून...

### महिलांनी शिक्षणाबरोबर

महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे महिला अत्यंत धाडसी कामे करतात.पुरूषाच्या बरोबरीने आज महिला काम करत आहेत.तळागाळातील उत्कृष्ट कार्य करत आहेत. अशा महिलांमुळे समाजातील महिला मुलींना प्रेरणा मिळत राहते असे त्यांनी मत व्यक्त केले. यावेळी गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर,गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, जिजाऊ ब्रिगेडच्या अहिल्या नगरच्या जिल्हाध्यक्षा अॅड स्वाती जाधव,ग्राम महसूल अधिकारी अंकीता जाधव यांनी आपले विचार मांडले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, सचिव जावेद पठाण, निसार शेख,अक्षय विधाते,समीर शेख, गहिनीनाथ पाचबैल, संतोष नागरगोजे, मारूती संत्रे,अतुल जवणे, प्रेम पवळ, संतोष तांगडे, सोपान पगारे, आदिनाथ ठोंबरे,संतोष दाणी, राजेंद्र लाड, सिताराम पोकळे,विठ्ठल राख, सचिन पवार, शिक्षक अनिल बेदरे,किरण शिनगिरे, विजय राजपुरे, ओंकार कदम, संस्कार लाड,आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समीर शेख यांनी केले तर या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन राजेंद्र लाड यांनी केले व आभार अविनाश कदम यांनी मानले.

या महिलांचा झाला पुरस्काराने सन्मान...

वैशाली मुकुंद साबळे (आदर्श माता ),रेखा भाऊसाहेब घुले(आदर्श शेतकरी महिला ),वंदना परिवंत गायकवाड (आदर्श महिला सरपंच), ब्रह्मकुमारी सुशिला बहेनजी (आध्यात्मिक समाजकार्यातील उत्कृष्ट महिला),कु.डॉ.शेख मेहविश आरा (आदर्श महिला वैद्यकीय अधिकारी), कीर्ती हांगे (आदर्श महिला शिक्षिका), अॅड स्वाती राजेंद्र जाधव (आदर्श शैक्षणिक व समाजकार्य ), श्रीमती कवडे अनिता साहेबराव (आदर्श ग्रामसेविका), अंकिता राजेंद्र जाधव ( आदर्श ग्राम महसूल अधिकारी), ज्ञानेश्वरी शंकर लांडे (आदर्श पशुधन पर्यवेक्षक महिला अधिकारी), ह भ प पुष्पाताई उमेश जगताप (उत्कृष्ट समाज प्रबोधनकार महिला), दिपाली अशोक काकडे (उत्कृष्ट खेळाडू), बावदाणकर संजीवनी सोपान (आदर्श कृषी सहाय्यक महिला), रुक्मिणी संपत मराठे (आदर्श अंगणवाडी सेविका), सुनिता रामदास जगताप (आदर्श आशा वर्कर), अंजली दिगंबर वाघमारे (उत्कृष्ट सुपरवायजर), सोनाली रुपेश उपाध्ये (उत्कृष्ट महिला उद्योजिका), अॅड पुष्पा भगत- गायकवाड (आदर्श महिला विधीज्ञ ), विजया मुळे (आदर्श समाज कार्य महिला) शिवनेरी महिला बचत गट पांढरी (आदर्श महिला बचत गट), वंदना सुरेश भैसाडे (आदर्श परिचारिका), वैष्णवी नामदेव रांगुळे (आदर्श कवियत्री), पूजा बिबीषण देवळकर- धोंडे (आदर्श महसूल सेविका), अर्चना सुभाष आरडे (उत्कृष्ट महिला पोलीस कर्मचारी), कल्पना गणेश पाटील (आदर्श सून ), सविता उगले (आदर्श सेविका), कोमल थेटे ( उत्कृष्ट रांगोळी महिला आर्टिस्ट), सुनिता नाथा शिंनगारे (उत्कृष्ट आशा वर्कर), सौ. ज्योती संजय पवार

आदर्श अबॅकस शिक्षिका,श्रीमती वेणूबाई विलास केसकर आदर्श स्वयंपाकी या विविध क्षेत्रातील महिलांना शाल, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व फेटा बांधून नारी सन्मान २०२५ हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

युवा पत्रकार संघाचा आदर्श इतरांनी घ्यावा - तहसीलदार वैशाली पाटील

बालविवाह रोखण्यासाठी पालकांचा सहभाग महत्त्वाचा आहे त्यासाठी बालविवाह प्रतिबंधक कायद्यांची माहिती सर्व पालकांपर्यंत पोहचून याबाबत जनजागृती करणे महत्त्वाचे आहे तर

युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद असून त्यांनी आष्टी तालुक्यात सामाजिक उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवले आहेत तसेच सर्वसामान्य गोरगरीब अन्याय विरोधात वाचा फोडण्याचे काम करत आहेत.आज प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. अनेक महिला ह्या उत्कृष्ट कार्य करून ही त्यांची दखल घेतली गेली नव्हती. आज युवा पत्रकार संघाने कर्तुत्वान महिलांचा खऱ्या अर्थाने सन्मान करून त्यांना न्याय दिला. त्यामुळे युवा पत्रकार संघाचा आदर्श इतरांनी घ्यावा असे प्रतिपादन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले.

### विकासकामे दर्जेदार

जाधव यांनी केले. सूत्रसंचालन शिवराज जाधव यांनी केले तर आभार ग्रामपंचायत सदस्य तुकाराम जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरपंच एकनाथ बनसोडे, उपसरपंच राहुल जाधव, ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव, संदीप जाधव, तुकाराम जाधव, ब्रह्मनाथ जाधव, बाळू जाधव यांनी परिश्रम घेतले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आ.अरविंद चव्हाण यांना

जिल्हाध्यक्ष शाह आलम खान, जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके, प्रदेश सरचिटणीस शकुंतला कदम , माजी जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मण दळवी, जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब गोरे जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चित्तेकर, जालना शहर कार्याध्यक्ष मिर्झा अन्वर बेग, धैर्यशील चव्हाण , राष्ट्रवादी काँग्रेस बदनापुर तालुका अध्यक्ष कैलास मदन, परतुर तालुकाध्यक्ष विठ्ठल बरकुले, अंबड तालुका अध्यक्ष सतीश ढवळे, जाफराबाद तालुकाध्यक्ष दत्तू अंभोरे, भोकरदन तालुकाध्यक्ष सुरेश सपाटे, मंठा तालुकाध्यक्ष गणेश घारे ,जालना तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे, कामगार आघाडीचे मराठवाडा कार्याध्यक्ष सतीश वाहुळे , आघाडी च्या जिल्हाध्यक्ष कांचन शिरभे, युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे , महिला जालना शहराध्यक्ष रिंकल तायड, विजय सोनवणे कृष्णा गाडेकर ज्ञानेश्वर कदम, किशोर सवडे, विलास भावले, अमोल खरात, संदीप गाडेकर श्रीराम पोटरे विठ्ठल मोहिते माणिकराव वायाळ यांच्यासह जालना जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती


जा.क्र.म.प./अंबड नामांतर
कार्यालय नगर परिषद अंबड २०२५/१२५
दिनांक : ०६/०३/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री. सौ. श्रीमती १) राजेंद्र मसू ढोणे २) उषा राजेंद्र ढोणे प्रकरण सर्वे नं ३८ सहान प्लॉट नं -५ न.प.मि.न १८-९५-५/१ चे हस्तांतर करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (५) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुःसिमा
पुर्व - प्लॉट नंबर ८ व ९
पश्चिम :-विक्रेती नं.२ मिरा राजेंद्र काळवंडे यांचा न.प.मि.नं.१८-९५-५/२ रा.आज रोजी सचिन ज्ञानदेव हराळे व सुरेखा सचिन हराळे यांना विक्री केलेला प्लॉट
दक्षिण प्लॉट नं.६
उत्तर :- ६ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता,

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# पिकाची मुळे कुरतडणाऱ्या हुमणीचा असा करा बंदोबस्त

बागायती पिकामध्ये ओलावा आणि अन्नपुरवठा सातत्याने होत असल्यामुळे हुमणी अळीचा प्रादुर्भाव वाढतो. खरीप तसेच रब्बी हंगामातील पिकांसह प्रामुख्याने ऊस पिकात हुमणीचा प्रादुर्भाव अढळून येतो. या किडीच्या नियंत्रणासाठी वेळीच सामुदायिक उपाययोजना केल्यातर हुमणीचा प्रादुर्भाव रोखता येतो. हुमणीच्या अंडी, अळी, कोष आणि भुंगेरे अशा चार अवस्था असतात. त्यात अळी अवस्था पिकांच्या मुळावर जगत असल्याने सर्वात नुकसानकारक असून, ती तीनवेळा कात टाकत मोठी होते. संपूर्ण जीवनक्रम वर्षभरात पूर्ण होत असला तरी त्यात अळी अवस्था ६ ते ८ महिने इतकी मोठी असते.




नियंत्रणाचे उपाय : हुमणीच्या जीवनक्रमात भुंगेरे हीच एक अवस्था थोड्या कालावधीसाठी जमिनीबाहेर असते. बाकी सर्व अवस्था जमिनीत असतात. त्यामुळे या अवस्थेत किडीचा बंदोबस्त करण्यावर जास्त लक्ष देणे गरजेचे आहे.

अ) भुंगेऱ्यांचा सामुदायिक बंदोबस्त : खरिप हंगामात पहिला पाऊस झाल्यावर हुमणीचे भुंगेरे सुर्यास्तानंतर बाभूळ, बोर, लिंब या झाडांवर पाने खाण्यासाठी गोळा होतात. अशा झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करावीत. रॉकेल मिश्रीत पाण्यात टाकून मारावेत. हा उपाय शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या केल्यास अंडी घालण्यापूर्वीच भुंगेऱ्यांचा नायनाट करणे शक्य होईल.

ब) हुमणी अळीचा बंदोबस्त : पीक काढणीनंतर लगेचच १५ ते २० सेंमी. खोल नांगरट करावी. नांगरणीवेळी उघड्या पडणाऱ्या अळ्या गोळा करुन रॉकेल मिश्रीत पाण्यात टाकून माराव्यात. आंतरमशागतीच्या वेळेस अळ्या गोळा करुन लोखंडी हुकच्या सहाय्याने किंवा खुरप्याने माराव्यात. पिकास पाणी देताना एखाद्या दिवशी पाणी जास्त काळ साचून ठेवल्यास अळ्या गुदमरून मरतील. हुमणीग्रस्त शेतातील कीडग्रस्त सुकलेली पिकांचे रोपे उपटावीत. मुळांशेजारील अळ्यांचा नाश करावा.

हुमणीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नसर्गिक शत्रू : पक्षी : बगळा, चिमणी, मैना, कावळा, घार इ. पक्षी त्यांचा फडशा पाडतात. प्राणी : मांजर, रानडुक्कर, मुंगूस, कुत्रा इ. प्राणी हुमणीच्या अळ्या आवडीने खातात. जिवाणू (बॅसीलस पॉपीली) व सूत्रकृमी (हेटरो-हॅब्डेटीस) हे होलोट्रिकीया हुमणीचे नैसर्गिक शत्रू आहेत. ड्रेंचिंग करुन हुमणीचे रासायनिक पद्धतीने नियंत्रण करता येते. मेटारायझियम ॲनिसोप्ली हे बुरशीजन्य कीटकनाशक शिफारशीत प्रमाणात शेणखतातून जमिनीत मिसळून दिल्यास हुमनीचे चांगल्याप्रकारे नियंत्रण होऊ शकते.

# ठिबक संचाची अशी घ्या काळजी



ठिबक सिंचन संच वापरादरम्यान भेडसावणाऱ्या प्रमुख समस्यामध्ये ड्रीपर बंद होऊन त्यांचा प्रवाह कमी होणे, वीज कमी जास्त होणे त्यामुळे संच चालण्यासाठी पुरेसा दाब न मिळणे, त्यामुळे शेतात सर्व ठिकाणी सारख्या प्रमाणात पाणी व खते न मिळणे, ठिबक सिंचनातील लोखंडी भाग गंजणे यांचा समावेश होतो. त्यामुळे ठिबक सिंचन संचाची योग्य देखभाल करण गरजेच आहे.

दररोज करावयाची देखभाल : डिझाइन केलेल्या दाबानुसार फिल्टर इनलेटवर आवश्यक दाब असल्याची खात्री करावी. वाळूची गाळण यंत्रणा फ्लशिंग पद्धतीने साफ करावी. सबमेनवरील फ्लश व्हॉल्व्ह खोलून सबमेन साफ करावी. जाळीचा फिल्टर, डिस्क फिल्टर फ्लश करावा. आठवड्यातून एकदा करावयाची देखभाल ड्रीपर - पाणी नेहमीपेक्षा जास्त दाबाने व वेगाने सोडावे म्हणजे छिद्रांच्या तोंडाशी अडकलेली घाण किंवा मातीचे कण निघून जातील.

एक ते दीड महिन्याने करावयाची देखभाल : पाण्याची प्रतवारी चांगली असल्यास किंवा कूपनलिकेचे पाणी असल्यास मुख्य नळी / उपमुख्य नळी / लहान जलवाहिन्या एक ते दीड महिन्यांनी साधारणपणे दीड पट जास्त दाबाने फ्लश करून स्वच्छ कराव्यात.

सहा महिन्यांनी करावयाची देखभाल : बंद पडलेल्या तोट्या एक टक्का आम्लाच्या पाण्याने साफ कराव्यात. जैविक कारणाने तोट्या बंद पडल्या असतील तर सहा महिन्यांतून एकदा क्लोरिनची प्रक्रिया करावी. पाण्यातील विद्राव्य क्षारांमुळे तोट्या बंद होत असतील, तर

आवश्यकतेप्रमाणे आम्ल प्रक्रिया करावी. लहान जलवाहिन्यात शेवाळाची वाढ होत असेल तर मोरचुदाची प्रक्रिया करावी.

वर्षातून एकदा करावयाची देखभाल : एक वर्ष संच सुरू असल्याने सतत घर्षण झाल्यामुळे फिल्टरमधील वाळूचे कण गोलाकार झाल्यामुळे फिल्टरमधील वाळू बदलावी. संचातील काही घटक खराब झाले असतील, तर ते दुरुस्त करावेत किंवा बदलावेत. पंपाची कार्यक्षमता तपासावी. पंप उत्पादकांनी दिलेल्या सूचनांनुसार पंपाची आवश्यक देखभाल करावी.

# कंपोस्ट खत बनविण्याची नाडेप पद्धत

नाडेप ही कंपोस्ट खत बनविण्याची पद्धत अलिकडे विकसित केली आहे. नाडेप पद्धतीनं कपोस्ट खत कसं बनवायचे याविषयी महात्मा फुले कृषी विद्यापीठानं दिलेली माहिती यासाठी उपयुक्त आहे.



टाकीचे बांधकाम :बांधकाम करत असताना खालचा थर हा सिमेंट वाळूमध्ये बांधावा. टाकी बांधताना प्रत्येकी दोन विटांच्या थरानंतर तिसऱ्या थरामध्ये प्रत्येकी दोन विटानंतर ६ ते ७ इंचाची मोकळी जागा सोडावी. अशा पद्धतीने विटांचे १० थर बांधून घ्यावेत. ३, ६ आणि ९ व्या थराला हवेसाठी मोकळी जागा सोडावी. अशा पद्धतीने ७४ छिद्रे असलेली टाकी बांधून होते. बांधकाम झाल्यानंतर टाकीच्या तळाला विटांचा कठीण थर द्यावा. टाकीच्या भिंती आतून माती आणि शेणाने लिंपून घ्याव्यात.

नाडेप कंपोस्ट टाकी भरण्याची पद्धत :नाडेपची टाकी भरत असताना सर्वप्रथम टाकीचा आतला भाग शेण आणि पाणी मिश्रणाने ओला करून घ्यावा. उपलब्ध असलेले सर्व सेंद्रिय पदार्थाचे बारीक तुकडे करून ६ इंच जाडीचा पहिला थर द्यावा. दुसऱ्या थरामध्ये १५० लिटर पाण्यामध्ये ४ किलो शेण मिसळून शिंपडावे. तिसऱ्या थरामध्ये, शेण आणि मातीचा २० ते ६० किलो याप्रमाणे एकसारखा थर द्यावा, आणि पाण्याने ओलावा करून घ्यावा.

खत निर्मिती कशी होते?: टाकी भरण्यासाठी साधारण १० ते १५ थर देऊन १ ते १.५ फूट टाकीच्या वर उंची येईल इतकी भरावी.

टाकी भरल्यानंतर माती व शेणाने झाकून घ्यावी. उत्तम प्रकारचे कंपोस्ट खत तयार करण्यासाठी नाडेप कंपोस्ट टाकीमध्ये आर्द्रतेचे प्रमाण ५० ते ६० टक्के रहाण्यासाठी ६ ते ७ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. एका टाकीतून ३ ते ४ महिन्याने उत्तम प्रतीचे २.५ ते ३ टन कंपोस्ट तयार होते. कुजलेले तपकिरी रंगाचे व कोणताही कुबट वास नसलेले हे कंपोस्ट खत पिकांसाठी वापरावे. तयार कंपोस्ट खतास चाळणीने चाळावे. चाळल्यानंतर राहिलेला भाग परत नाडेप कंपोस्टींगसाठी टाकीमध्ये वापरावा.

# संत्रावर्गीय फळपिकांवरील 'कोळी कीडीचा' प्रादुर्भाव आणि नियंत्रण

मोसंबी व संत्रा फळ पिकांवर कोळी कीडीचा प्रादुर्भाव आढळून येत असतो. कोळी ही कीड अष्टपाद वर्गातील असून, आकाराने सूक्ष्म असते. साध्या डोळ्याने दिसणे कठीण जाते. पानांच्या शिराजवळ किंवा बरेचदा फळांच्या सालीवर बारीक खळग्यात ती अंडी घालते. प्रौढ लांबट, पिवळे असून, पिल्ले फिक्कट पिवळसर असतात. पिल्ले व प्रौढ कोळी आकाराचा फरक सोडल्यास सारखेच दिसतात. प्रादुर्भाव वर्षभर असला तरी फळ धारणेपासून ते फळ काढणीपर्यंत आणि ऑगस्ट ते ऑक्टोंबर दरम्यान जास्त असतो.



प्रादुर्भावाची लक्षणे : पाने व फळांचा पृष्ठभाग खरवडतात व त्यातून येणारा रस शोषून घेतात, त्यामुळे पानांवर आणि फळांवर करडे ठिपके आढळून येतात. प्रादुर्भाव वाढल्यास फळांवर तपकिरी लालसर रंगाचे चट्टे पडतात. या अवस्थेला शेतकरी 'लाल्या' म्हणून ओळखतात. या किडीमुळे फळांचे नुकसान होऊन अनियमित आकाराची फळे तयार होतात. प्रादुर्भावग्रस्त फळांचा रंग बदलतो व प्रत खालावते. त्यामुळे बाजारात कमी भाव मिळतो.

कोळी किडीचे व्यवस्थापन : उन्हाळ्यामध्ये पाण्याचा ताण दिलेल्या झाडांना योग्य प्रमाणात पाणी मिळत आहे याची खात्री करून घ्यावी. पाण्याचा ताण पडल्यास कोळीचा प्रादुर्भाव वाढतो. अझेंडीरॅक्टीन (१%) २ मि.ली. किंवा अझेंडीरॅक्टीन (५%) ०.५ मि.ली. प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी फवारणी केल्यास ही कीड. नियंत्रणात ठेवता येते. १५ दिवसांच्या अंतराने पेट्रोलियम स्प्रे ऑईल (हॉर्टीकल्चर मिनरल ऑईल) २% प्रति लिटर पाणी या प्रमाणात घेऊन दोनदा फवारणी करावी. कोळीचा प्रादुर्भाव दिसताच डायकोफॉल (१८५ ई सी) २ मिली किंवा डायफेनथीयुरॉन (५० डब्ल्यू पी) २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी १५ दिवसांच्या अंतराने फवारणी केल्यास ही कीड नियंत्रणात ठेवता येते.

# खोडवा ऊस :कमी मेहनत,जलद वाढ,अधिक उत्पादन

ऊस उत्पादनासाठी लागणारे श्रम आणि खर्च यामुळे शेतकऱ्यांसाठी विविध आव्हाने निर्माण होतात. यामध्ये खोडवा ऊस पिकाची लागवड एक महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो. खोडवा ऊस पिकाची लागवड ही पारंपरिक ऊस लागवडीपेक्षा अधिक फायदेशीर ठरते



पूर्व मशागतीवरील खर्चाची बचत : खोडवा ऊस पिकाची लागवड करण्यासाठी पूर्व मशागत करणे आवश्यक नसते. पारंपरिक ऊस लागवडीमध्ये जमिनीत पूर्व मशागतीसाठी वेळ आणि खर्च लागतो, परंतु खोडवा पिकात हे सर्व खर्च वाचतात. यामुळे शेतकऱ्यांचा हेक्टरी खर्च कमी होतो, ज्यामुळे आर्थिक बचत होते.

वेळ आणि श्रमाची बचत : या पिकाच्या लागवडीसाठी कमी वेळ आणि श्रम लागतात, ज्यामुळे शेतकऱ्यांची अतिरिक्त वेळ आणि ऊर्जा बचत होऊ शकते.

पुन्हा लागवडीवरील खर्चात बचत : खोडवा पिकामुळे, शेतकऱ्यांना बेणे, बीजप्रक्रिया आणि ऊस लागवडीसाठी लागणारे इतर खर्च कमी होतात. साधारणपणे, या पिकामुळे प्रति हेक्टरी ४०,००० ते ४२,००० रुपये पर्यंतची बचत होऊ शकते. यामुळे शेतकऱ्यांना अधिक फायदेशीर पर्याय मिळतो.

जलद वाढ आणि लवकर तयार होणे : लागणीच्या ऊसाला तोडल्यानन्तर खोडव्यास लगेच पाणी दिल्यास त्याच्या बुडख्यांचे डोळे लवकर फुटतात, आणि त्याची वाढ लवकर सुरू होते. यामुळे, उसाचे खोडवा पीक पारंपरिक पिकापेक्षा एक ते दीड महिना लवकर तयार होऊ शकते. यामुळे शेतकऱ्यांना जलद उत्पादन मिळते.

साध्या व्यवस्थापनातून जास्त उत्पादन : खोडवा पिकाच्या व्यवस्थापनाची प्रक्रिया साधी असते, तरीही या पिकातून लागणीच्या पिकापेक्षा अधिक उत्पादन मिळवता येते. कमी व्यवस्थापनात अधिक उत्पादन हा खोडवा पिकाचा एक मोठा फायदा आहे, जो शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरतो.

जास्त ऊसाचे उत्पादन : खोडवा पिकामध्ये जमिनीतील बुडख्यांवर अधिक डोळे असतात, ज्यामुळे उसाची संख्या पारंपरिक ऊसापेक्षा जास्त होते. यामुळे अधिक उसाचे उत्पादन होऊ शकते, जे शेतकऱ्यांच्या उत्पन्नासाठी फायद्याचे ठरते.

पाणी आणि ओलीचे संरक्षण : खोडवा पिकाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ते जास्त पाणी आणि ओलीचे संरक्षण सहन करू शकते. पाणी कमी असतानाही हे पीक चांगले वाढते, आणि त्यामुळे त्यात उत्पादनावर कोणतीही अडचण येत नाही. या पिकात तणांचे नियंत्रण देखील योग्य प्रकारे केले जाते.

सेंद्रिय कर्ब वाढवणे : खोडवा पिकामध्ये पाचटाचा पूर्ण वापर करता येतो. या प्रक्रियेमुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढतो, जे पुढे जाऊन जमिनीची उत्पादनक्षमता वाढवण्यास मदत करते. यामुळे शेतकऱ्यांच्या पर्यावरणीय पद्धतीतही सुधारणा होऊ शकते.

निष्कर्ष : खोडवा ऊस पिकाची लागवड पारंपरिक ऊस पिकाच्या तुलनेत अधिक फायदेशीर ठरू शकते. या पिकात कमी खर्च, कमी श्रम, जलद उत्पादन, अधिक ऊस आणि पर्यावरणीय फायदे यामुळे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या मदत होते. जर शेतकऱ्यांनी याला योग्य प्रकारे लागवड केली, तर ते त्यांचे उत्पादन आणि नफा मोठ्या प्रमाणात वाढवू शकतात.




## महत्वाच्या घटना

१३६५: ऑस्ट्रेलिया देशाची राजधानी वियना येथे विश्वविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

१७५५: अमेरिकेमध्ये वाफेवर चालणाऱ्या इंजिनचा वापर खादानीतून पाणी काढण्यासाठी करण्यात आला होता.

१८३८: ब्रिटीश रसायनशास्त्रज्ञ सर विलियम हेनरी पर्किन यांचा जन्मदिन.

१८९४: कोका-कोला बाटली मध्ये भरून विक्रीस सुरवात.

१९०४: ब्रिटेन देशांत लाईन वर चालणारी पहिली इलेक्ट्रिक रेल्वे सुरु करण्यात आली.

१९११: कृष्णाजी प्र. खाडिलकरांच्या संगीत मानापमानाचा पहिला प्रयोग झाला.

१९११: गोवा राज्याचे पहिले मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांचा जन्मदिन.

१९१२: कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी लिहीलेल्या 'संगीत मानापमान' या नाटकाचा पहिला प्रयोग किर्लोस्कर नाटक मंडळीने मुंबईतील रिपन नाट्यगृहात केला.

१९१८: रशियाची राजधानी सेंट पीट्सबर्ग येथून मास्को येथे हलविण्यात आली.

१९३०: ब्रिटिश सरकारने भारतात तयार केलेल्या मिठावर बसवलेल्या अन्यायकारक करामुळे महात्मा गांधी यांनी २०० मैलाच्या दांडीयात्रेला सुरूवात केली.

१९६८: मॉरिशस (इंग्लंडपासून) स्वतंत्र झाला.

१९५४: भारत सरकार मार्फत साहित्य अकादमी पुरस्काराचे उद्घाटन करण्यात आले.

१९९१: जेजुरी येथील खंडोबा मंदिरात चोरी

१९९२: स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २४ वर्षांनी ब्रिटिश सत्तेची सर्व जोखडे झुगारुन देऊन मॉरिशस प्रजासत्ताक बनले.

१९९३: मुंबई येथे झालेल्या १२ स्फोटांच्या मालिकेत ३०० हून अधिकजण ठार तर हजारो लोक जखमी.

१९९९: चेक प्रजासत्ताक, हंगेरी व पोलंड 'नाटो' मधे सामील झाले.

१९९९: सरकारी नोटांवर यापुढे महात्मा गांधींचेच चित्र असेल असा सरकारतर्फे निर्णय घेण्यात आला.

२००१: राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही मूल्ये, सामाजिक आणि आर्थिक विकास या क्षेत्रांतील बहुमोल कामगिरीबद्दल देण्यात येणारा 'यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार' ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी व पर्यावरणवादी नेते सुंदरलाल बहुगुणा यांना प्रदान करण्यात आला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८९१: 'नटवर्य' चिंतामणराव कोल्हटकर अभिनेते व निर्माते

१८२४: गुस्ताव किरचॉफ जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १७ आक्टोबर १८८७)

१९११: दयानंद बाळकृष्ण ऊर्फ 'भाऊसाहेब' बांदोडकर गोव्याचे पहिले मुख्यमंत्री, महाराष्ट्रवादी गोमांतक पक्षाचे संस्थापक, उद्योगपती आणि दानशूर (जन्म: १२ ऑगस्ट १९७३)

१९१३: यशवंतराव चव्हाण भारताचे ५ वे उपपंतप्रधान, संरक्षणमंत्री व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री (मृत्यू:२५ नोव्हेंबर १९८४)

१९२४: जर्मन भौतिकशास्त्रज्ञ गुस्ताव किरचॉफ यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १८८७)

१९३१: साउथवेस्ट एअरलाईन्स चे सहसंस्थापक हर्ब केलेहर यांचा जन्म.

१९३३: लेखिका कविता विश्वनाथ नरवणे यांचा जन्म.

१९८४: प्रसिध्द पार्श्वगायिका श्रेया घोशाल यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४२: रॉबर्ट बॉश जर्मन अभियंते आणि उद्योजक (जन्म: २३ सप्टेंबर १८६१)

१९६०: भारतीय इतिहासकार क्षितीमोहन सेन यांचे निधन. (जन्म: २ डिसेंबर १८८०)

१९८०: सुप्रसिध्द तबलावादक वसंतराव आचरेकर.

१९९९: यहुदी मेनुहिन प्रसिद्ध व्हायोलिनवादक व वाद्यवृंदसंचालक (जन्म: २२ एप्रिल १९१६)

२००१: रॉबर्ट लुडलुम अमेरिकन लेखक (जन्म: २५ मे १९२७)

# अशी करा योग्य कलिंगडाची काढणी



उन्हाळ्यात कलिंगडाला चांगली मागणी असते. त्यामुळे वेळेवर लागवड केलेले कलिंगड पीक सध्या काढणीस तयार आहेत. कलिंगड पीक कमी कालावधीचे पीक असून ६५ ते ९० दिवसात काढणीस तयार होते. कलिंगडाची काढणी केंव्हा करावी ? तसेच काढणीयोग्य कलिंगड कसे ओळखावे? याविषय़ी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने दिलेली माहिती उपयुक्त ठरते.

सूर्यप्रकाशापासून कलिंगड फळाचा बचाव करण्यासाठी व फळांच्या खालच्या बाजूला पिवळसर डाग न पडण्यासाठी फळे भाताच्या तुसाने किंवा गवताने झाकून घ्यावीत. काढणीपूर्वी कलिंगड पिकास सहा ते सात दिवस आधीच पाणी देणे बंद करावे. बऱ्याच ठिकाणी कलिंगड हे पीक काढणीसाठी तयार असून फळ तयार झाले की नाही हे ओळखण्यासाठी फळावर टिचकी मारल्यास तयार झालेल्या फळाचा टणटण असा आवाज येतो. तयार फळाच्या जमिनीलगतचा रंग पिवळसर होतो. तयार फळाच्या देठाजवळील तंतू सुकलेले असतात. काढणीस तयार कलिंगड पिकावर मावा, तुडतुडे या रसशोषक किडींचा प्रादुर्भाव झाल्यामुळे पानातून मधाळ अशा चिकट पदार्थाचे स्त्रवण होऊन त्यावर काळ्या बुरशीची वाढ होते. त्यामुळे फळे चिकट होऊन फळावरती काळ्या बुरशीची वाढ होण्याची शक्यता असते. अशावेळी काढणीनंतर फळे धुऊन पुसून घ्यावीत.

# सिंचन योजनांना पुरवणी मागण्यांत निधी द्या-कुटे महाराज

## अर्थसंकल्पाकडून शेतकऱ्यांचा अपेक्षाभंग, सिरसमार्ग उपोषणकर्त्यांची मागणी

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचा शेती सिंचन योजनेचा मोठा अनुशेष आहे, या अर्थसंकल्पातही जिल्ह्यातील सिंचन योजनांना निधी न मिळाल्याने शेतकऱ्यांतून नाराजी व्यक्त होत आहे त्यामुळे राज्य सरकारने पुरवणी मागण्यांमध्ये बीड जिल्ह्यातील सिंचन योजनांना मोठा निधी द्यावा अशी मागणी हरिभक्त परायण राजभाऊ महाराज कुठे यांनी व्यक्त केले. ते गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या उपोषणातील कीर्तनात बोलत होते.




या उपोषणास माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांचे बंधू एड. चंद्रकांत आप्पा नवले, बाळासाहेब सानप, हभप बबनदेव जोशी, जगदिश जाधव, विशाल भोसले, महादेव शेळके,संतोष काळे, नामदेव दंडवते,बाबुराव फरतारे, विठ्ठल काळे, सरपंच दत्तात्रय कोळेकर, माजी सरपंच गणेश कोळेकर यांच्यासह बहाद्दरपूर ग्रामस्थांनी भेट देऊन सहभाग घेतला. यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, राजेसाहेब काका पवळ, राम नवले, गणेश रडे, संतोष रडे, संतराम बागलाने, चंद्रकांत मुळे आदी उपस्थित होते. सोमवारी राज्याचे अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पांकडून सिरसमार्ग येथे सुरू असलेल्या १४० गावातील शेतकऱ्यांच्या उपोषणकर्तेच्या मोठ्या अपेक्षा होत्या. जायकवाडीचे पाणी उपसा सिंचन योजना राबवून सिंदफणा नदीपात्रात सोडावे, सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावे, मातोरी, मादळमोही, सिरसदेवी या राष्ट्रीय महामार्गालगत उप कालवा करावा, नदी जोड प्रकल्पात सिंदफणा नदीचा समावेश करावा आदी मागण्यासाठी गेल्या नऊ दिवसांपासून सिरसमार्ग येथे शेतकऱ्यांचे उपोषण चालू आहे. या आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे म्हणाले की पालकमंत्री अजित दादा यांच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या, मात्र या आंदोलनाच्या मागण्यांना अर्थसंकल्पात काही स्थान नसल्याचे ही ते म्हणाले. उपोषणस्थळी झालेल्या कीर्तन सेवेत हभप राजाभाऊ महाराज कुटे म्हणाले की सिंदफणा पट्ट्यातील विकासासाठी शेतकऱ्यांच्या मागण्या शासनाने मंजूर कराव्या व त्यासाठी अर्थसंकल्पात निधी अपेक्षित होता असेही ते म्हणाले. मात्र अर्थसंकल्पात भरघोस निधी नसल्याने आता पुरवणी मागण्यांमध्ये सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावे, जायकवाडी धरणाच्या उजव्या कालव्याला उप कालवा करावा, जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडावे यासह इतर योजनांना निधी द्यावा असेही ते म्हणाले.

विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील सिंचनाच्या योजनांसाठी अर्थमंत्री अजितदादा पवार यांनी हजारो कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मात्र मराठवाड्यातील व बीड जिल्ह्यातील योजनांसाठी केवळ घोषणा केल्या आहेत. गेल्या अनेक वर्षापासून वर्षांपासून शासन प्रत्येक अर्थसंकल्पात व सभागृहात याच केवळ घोषणा करीत असल्याची टीका या आंदोलनाचे समन्वयक देविदास चव्हाण, महादेव रडे यांनी केली.

### मुख्यमंत्री, जलसंपदा मंत्र्यांची भेट घेऊ-नवले

सिरसमार्ग येथील उपोषणाला सोमवारी एड चंद्रकांत आप्पा नवले यांनी भेट दिली. यावेळी उपोषणकर्त्यांशी बोलताना चंद्रकांत नवले म्हणाले, की सिरसमार्ग येथील उपोषणकर्ते शेतकऱ्यांच्या मागण्या शासन स्तरावरील आहेत. या मागण्या मंजूर करण्यासाठी शेतकर्यांसोबत आपण असून या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन मागण्या मंजूर करून घेऊ.

### मुख्यमंत्री यांनी मागणी मान्य करावी- वाघमोडे महाराज

सिंदफणा पट्ट्यात बारमाही सिंचनाच्या सुविधा नाहीत, आपल्या भागात कायम सिंचनाची एकही सुविधा नाही, त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भागात सिंचनाच्या सुविधा कराव्यात असे प्रतिपादन हभप परमेश्वर महाराज वाघमोडे यांनी केले. सिरसमार्ग येथे उपोषणस्थळी आयोजित कीर्तनात ते बोलत होते.

## ज्ञानाचे प्रयोगशाळेतून जमिनीकडे स्थलांतर होणे आवश्यक -दत्ता ढाले




पाटोदा । प्रतिनिधी

नवीन तंत्रज्ञान व संशोधनाचा सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी वापर होणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमतेचे तंत्रज्ञान हे मानवनिर्मित व मर्यादित आहे परंतु जैवविज्ञानाचे अध्ययन हे अमर्यादित आहे. जैवविज्ञानासमोर नवनवीन आव्हाने उभी आहेत. ग्रामीण भागातील लुप्त पावत असलेले तंत्रज्ञान पुनरुज्जीवित करून शहरी भागात जाणे आवश्यक आहे त्याशिवाय ग्रामीण भागाचा आर्थिक विकास साध्य होणार नाही म्हणून जैवविज्ञान प्रयोगशाळेत प्राप्त होणारे ज्ञान हे जमिनीकडे सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी स्थलांतरित होणे अत्यावश्यक आहे असे प्रतिपादन धुळ्याच्या घोगरे विज्ञान महाविद्यालयाचे वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रोफेसर दत्ता ढाले यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ११ मार्च रोजी महाविद्यालयाच्या जैवविज्ञान संकुल व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य तथा परिषदेचे मुख्य संयोजक प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर परिषदेचे निमंत्रक प्रो. गणेश पाचकोरे, उपप्राचार्य तथा सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ. अभय क्षीरसागर, उपप्राचार्य तथा रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रो. सतीश माउलगे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रो. अनिता धारासूरकर, प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रो. प्रशांत पाटील, कमवि उपप्राचार्य नामदेव चांगण, पर्यवेक्षक अनिल जोगदंड उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे संस्थापक कै. सोनाजीराव क्षीरसागर व कै. केशरबाई क्षीरसागर 'काकू' यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पमाल्यार्पण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. यानंतर स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. परिषदेच्या प्रास्ताविकपर भाषणात प्रोफेसर गणेश पाचकोरे यांनी परिषदेचा उद्देश व रूपरेषा स्पष्ट केली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे म्हणाले की, सामाजिक शास्त्रे व विज्ञानशाखा यांची परस्पर सांगड घालणे गरजेचे आहे. विज्ञानाचे अध्ययन करणे ही काळाची गरज असून प्रगल्भ दृष्टिकोन विकसित करून अनिष्ट रूढी व परंपरांचे उच्चाटन होणे आवश्यक आहे. विज्ञानाशिवाय समाजाची सर्वांगीण प्रगती शक्य नाही म्हणून विज्ञानाच्या माध्यमातूनच समाजव्यवस्थेत परिवर्तन आणावे असे आवाहन त्यांनी उपस्थित संशोधक व प्राध्यापकांना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोजकुमार प्रकाश यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. शकुंतला बडे यांनी केले. राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमास जैवविज्ञान शाखेच्या विविध अभ्यासमंडळांचे सदस्य, संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, विविध महाविद्यालयांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

## स्थानवंदन पदयात्रेचे लिंबागणेश येथे जल्लोषात स्वागत

लिंबागणेश। प्रतिनिधी

महानुभव पंथाचे संस्थापक,थोर समाजसुधारक तत्वज्ञ चक्रधर स्वामी यांच्या आदरणीय परमपूज्य महंत कानळसकर बाबा महानुभव यांच्या मार्गदर्शनाखाली दि.६ मार्च रोजी आष्टी तालुक्यातील वाकी येथुन शुभारंभ झालेली पदयात्रा शिराळा, पारगाव जोगेश्वरी आष्टी,मातकुळी,वनदेव,रामदरा,सौताडा,साक्त, पाटोदा, वैद्यकिन्ही,लिंबागणेश,पोहिचा देव,पाली आणि बीड येथे समाप्ती होणार आहे. पदयात्रेचे हे विसावे वर्ष आहे. श्रीसर्वतीर्थ सेवा महानुभव आश्रम बक्तरपुर स्थानवंदना पदयात्रेचे आज दि.११ मंगळवार रोजी सकाळी बीड तालुक्यातील लिंबागणेश नगरीत घरासमोर रांगोळी, औक्षण करत आतीशबाजी करत जल्लोषात स्वागत करण्यात आले. लिंबागणेश येथील श्रीकृष्ण मंदिरात चक्रधर स्वामी मंदिरात महानुभव भक्तांच्या वतीने बाबांचे शाल श्रीफळ आणि पुष्पहार करून स्वागत करण्यात आले.श्रीकृष्ण मंदिरात विडा,आवसर, देवाला आरती करून महंत कानळसकर यांचे सुश्राव्य प्रवचन झाले.चक्रधर स्वामींच्या पदस्पर्शाने पावन स्थांनांची महती सविस्तर विशद करून सांगितली.दुपारी देवाला उपहार करून भोजन करण्यात आले.भोजनाची व्यवस्था श्रीकृष्ण मंदिर देवस्थान व गावातील महानुभव भक्तांच्या वतीने करण्यात आली होती. यावेळी बाळुकाका पाटोदकर, राजाभाऊ गिरे, अर्जुन गिरे,अनंतकाका मुळे, भालचंद्र गिरे,गोवर्धन गिरे, सुदाम मुळे, तुळशीराम वनवे,किसन आबदार , ज्योती पाटोदकर आशाबाई गिरे,सिंधुबाई गिरे, ज्योती गिरे,उषाबाई मुळे व भाविक उपस्थित होते. दुपारचे भोजण आणि विश्रांती नंतर पदयात्रा पोहिचा देव कडे मार्गस्थ झाली.



## पीएमश्री विडोळी शाळेची सहल संपन्न



मंठा । प्रतिनिधी

विडोळी येथील पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची मोफत शैक्षणिक सहल १० मार्च रोजी संपन्न झाली. सहलीत पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना लोणार सरोवर येथे रविवारी तर सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांना सोमवारी छत्रपती संभाजीनगर, वेरूळ लेणी, दौलताबाद किल्ला, सिद्धार्थ प्राणी संग्रहालय,भद्रा मारुती आदी स्थळे प्रत्यक्ष दाखवून माहिती देण्यात आली. गटशिक्षणाधिकारी विपुल भागवत, विवेकानंद कुलकर्णी,गट समन्वयक के.जी.राठोड, केंद्रप्रमुख डी.ए. चव्हाण यांच्या मार्गदरशनाखाली पालक, मुख्याध्यापक, शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती यांनी सहल यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

## तुलसी महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले स्मृति दिनानिमित्त अभिवादन



बीड । प्रतिनिधी

बीड येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात सोमवार दिनांक १० रोजी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले स्मृति दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे यांनी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीही पुष्पांजली अर्पण करून सावित्रीमाई फुले यांना स्मरण केले. या कार्यक्रमातून सावित्रीमाई फुले यांच्या जीवनातील संघर्ष, त्यांचे सामाजिक योगदान आणि विचार याबद्दल माहिती सांगण्यात आली. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन समाजातील समानता, शिक्षण आणि स्त्री सशक्तिकरणाच्या दिशेने काम करण्याचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास प्राचार्य प्रा. डी.जी. निकाळजे यांच्यासह इतर प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## सिद्धेश्वर महादेव प्राणप्रतिष्ठा द्वितीय वर्धापन दिन व गायत्री यज्ञ

बीड । प्रतिनिधी

येथील श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर येथे गेल्या दोन वर्षापूर्वी मंदिराचे अध्यक्ष ॲड मंगेश पोकळे सर यांच्या मार्गदर्शनाने व परदेशी परिवारातर्फे शिवलिंगाची स्थापना करण्यात आली होती.आज दिनांक १०/३/२५ अमलकी एकादशी च्या पावन पर्वावर द्वितीय वर्धापन दिनानिमित्त श्रीराम परदेशी व ,दत्तात्रेय परदेशी यांनी शिवलिंगाचा रुद्राभिषेक श्री श्री श्री १००८ महामंडलेश्वर महास्वामी शिवरुद्रानंद सरस्वती महाराज यांच्या शुभहस्ते शिवलिंगाचा रुद्राभिषेक करण्यात आला.



गायत्री परिवार बीड यांनी अमलीकी एकादशीच्या निमित्ताने गायत्री महायज्ञाचे आयोजन केले होते. या यज्ञाचे यजमान श्रीराम परदेशी,दत्तात्रय परदेशी, या परिवाराने स्थापन केलेल्या शिवाची अहोरात्र सेवा करत आहेत. व त्यामुळे पंचक्रोशीतील शिव भाविक सुद्धा त्याचा लाभ घेत आहेत. या सर्व कार्यक्रमाला ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे बीड जिल्हा समन्वयक गायत्री परिवार. हनुमानदास बियाणी, साईनाथ दुधाळ , दुधाळ ताई,पोकळे ताई. पोकळे काकू, महावीर बोरा ,मेढे, तुकाराम पंत जोशी ,चाटे साहेब दैनिक चंपावती पत्राचे महादेव नाना साळुंके ,म्हेत्रे काका. भराटे, विलास लेंबे, मुकुंद भुत्पले, गायकवाड साहेब, रत्नपारखी काका, मुंडे ताई, बाळू काका जायभाये, यांच्यासह यशवंत नगर व परिसरातील असंख्य भाविक भक्त या कार्यक्रमाला उपस्थित होते. यज्ञा नंतर सर्वांनी फराळाचा आस्वाद घेतला.

जाहीर प्रगटन

**मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ४३२/२०२५**

**श्रीधर विरूध्द निरंक**

अर्जदार : १. श्रीधर पि. नारायन शेळके, वय ६० वर्षे, धंदा शेती व सेवानिवृत्त, २. निखील पि. श्रीधर शेळके, वय २६ वर्षे, धंदा शिक्षण, ३. नम्रता पि. श्रीधर शेळके, वय २७ वर्षे, धंदा शिक्षण, सर्व रा. बालाघाट शिक्षक कॉलनी, बंकटस्वामी कॉलनी, कॅनल रोड, ता. जि.बीड.

विरुध्द निरंक

मागणी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत अनिता श्रीधर शेळके मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत अनिता श्रीधर शेळके यांचा मृत्यु दिनांक २७/०१/२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत अनिता श्रीधर शेळके यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत अनिता श्रीधर शेळके यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०३/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१/०४/२०२५ आहे.

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

(शिक्का)

## अनंत राऊत यांच्या कवितेने शेतकरी कीर्तन महोत्सवाचे उद्घाटन

बीड। प्रतिनिधी

समाज मनात आज सर्वत्र जात्यंधता, धर्मांधतेचा वणवा पेटलेला पहायला मिळतोय. प्रत्येकजण एकमेकांकडे संशयाने पहातो आहे, अशा कळात संत विचाराच्या वर्षावाने प्रेमाचा गारवा निर्माण करण्याचे काम शेतकरी कीर्तन महोत्सवातून होत आहे. संत विचारातून सामाजिक सलोखा निर्माण होईल, असा आशावाद प्रसिद्ध कवी अनंत राऊत यांनी व्यक्त केला. शेतकरी कीर्तन महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कान्नापूर येथील बस स्थानकाजवळ जगद्गुरू तुकाराम महाराज बीजेनिमित्त शेतकरी कीर्तन महोत्सवाचे उद्घाटन अनंत राऊत यांच्या उपस्थितीत झाले या प्रसंगी कॉ. डी. एल. कराड हे अध्यक्ष स्थानी होते. जागतिक कीर्तीचे पखवाज वादक उद्धव बापू आपेगावकर आणि कैकाडी महाराज यांचे वंशज, कैकाडी महाराज मठाचे मठाधिपती भारत महाराज जाधव यांच्या हस्ते मृदंग आणि वीणा पूजन झाले.




यावेळी बोलताना अनंत राऊत म्हणाले की, संतांच्या विचारधारेतून गावखेड्यातील सामाजिक सलोखा भक्कम होता. आमच्या गावच्या महादेवाच्या मंदिरातील हरिनाम सप्ताहात पठाण चाचा कीर्तनकारामागे टाळ घेऊन उभे असत, तर मोहरमचा ताजिया सर्व हिंदू बांधव सजवीत असत. लहानपणी शाळेत सर्व जाती-धर्माचे आम्ही मित्र एकत्र जेवत असू. एकमेकाच्या डब्यात मोकळेपणाने हात घालून एकमेकाची भाजी भाकरी घेत असू. आज अचानक धर्म खतरे में असल्याच्या आरोळ्या कानावर येत आहेत. खर तर *ना हिंदू खरे में हैं, ना मुसलमान खतरें में है. यांचे राजकीय अस्तित्व खतरे में* आलं की, तरुणांना धर्माच्या नावाने भडकविले जाते. तेव्हा राजकीय लोकांच्या भूलथापांना बळी पडून गावातील सामाजिक सलोखा, बिघडू देऊ नका, असे आवाहनही राऊत यांनी केले. संत तुकाराम महाराज हे समाजातील दांभिकतेवर प्रहार करणारे क्रांतीकारी कवी होते. त्यांनी धर्माच्या नावाने केल्या जाणाऱ्या पाखंडाचे खडंण केले, म्हणून त्यांच्या गाथा बुडविण्यात आल्या. आज शेतकरी कीर्तन महोत्सवातून त्याच गाथेचा विचार समाजात रुजविण्याचे प्रयत्न होत आहेत, असेही कराड म्हणाले. रात्रीच्या कीर्तनात ह.भ.प. हरिदास महाराज तम्मेवार यांनी तुकाराम महाराज यांचा जेथे कीर्तन करावे तेथे अन्न न सेवावे हा अभंग कीर्तन सेवेसाठी निवडला. त्यावर निरुपण करताना कीर्तन परंपरेला आलेल्या बाजारूपणावर प्रहार केला. वारकरी संप्रदायाचे विचार फक्त बोलण्यात नसावेत. जे मतदानासाठी पैसे घेत असतील, जे स्रीयांचा सन्मान करीत नसतील, जे समाजात जात्यंधता, धर्मांधता, अंधश्रद्धा पसरवत असतील, त्यांनी बुक्का लावू नये भाळा, माळ घालू नये गळा, असे तुकाराम महाराज यांच्या भाषेत ठणकावून सांगितले. वीणा-मृदंग पूजन प्रसंगी बोलताना उद्धव बापू आपेगावकर यांनी कठरपंथीयांकडू भक्ती परंपरेला लावला जात असलेला सुरुंग अधोरेखित केला. ते म्हणाले, महाराष्ट्रातील संत परंपरेने भेदभावाला, चमत्काराला थारा न देता सहिष्णुतेचा धर्म जपल आणि वाढवलाही. साधुसंताच्या या व्यापक वारस्याला अलीकडल्या काळात कठरपंथी विकृत धर्मवाद्यांकडून सुरंग लावण्याचे काम सुरू आहे. महाराष्ट्रातील वारकरी चळवळीला हे उत्तरेकडील स्वयंघोषित संत तिलांजली देण्याची काम करत आहेत. हे थांबवण्यासाठी या कीर्तन महोत्सवातून प्रयत्न होताना पाहून आनंद होत असल्याचा विश्वास पं. उद्धव बापू आपेगावकर यांनी व्यक्तकेला. यावेळी बोलताना भारत महाराज जाधव यांनीही पाखंडावर कठोर शब्दांत प्रहार केले. कुणी अघोरी साधना केली. स्वतःच्या देहाला यातना दिल्या. त्याने जर दुसऱ्याचे कल्याण होत नसेल; तर असे चमत्कार काय कामाचे! शाही स्नानाने अंतकरण शुद्ध होत नसेल तर प्रयागराजला जाण्यात काय अर्थ आहे? यापेक्षा स्वतःचे अंतकरण शुद्ध करून माणसाने माणसासोबत माणसासारखे वागणे, तण मन अंत:करणाची स्वच्छता राखणे, मुलाबाळांना शिकवणे, हे संत नामदेव महाराज -ज्ञानेश्वर महाराजांपासून ते आधुनिक संत घाडगे बाबा, तुकडोजी महाराजांपर्यंत महाराष्ट्राच्या मातीने जपली आहे. तीच धुरा हा शेतकरी कीर्तन महोत्सव पुढे नेत आहे', असे भारत महाराज जाधव म्हणाले.

# महिलांनी शिक्षणाबरोबर आपल्या पाल्याला सुसंस्कारांची सांगड घालावी - प्राजक्तताई धस

## आष्टी येथे नारी सन्मान पुरस्काराने ३० कर्तबगार महिलांचा सन्मान

आष्टी । प्रतिनिधी

महिलांनी चूल आणि मूल यापुरते मर्यादित न राहता शिक्षणाबरोबर संस्काराची सांगड घालावी आणि कौटुंबिक आर्थिक परिस्थितीच्या प्रगती करण्यासाठी महिलांनी पुरुषाच्या बरोबर आपला संसाराचा गाडा अधिक जोमाने न्यायला पाहिजेत. तसेच आपल्या मुलामुलींच्या शिक्षणासह सोबत संस्काराकडे लक्ष दिले पाहिजे.मुलींनो सैराट चित्रपट पहा पण सैराटचा शेवटचा भाग दहावेळा पहा त्यामुळे विचार करून निर्णय घ्यावा आणि आपल्या शिक्षणाकडे अधिक लक्ष केंद्रित करून काही तरी अधिकारी होण्यासाठी प्रयत्न करा तर आज महिला सर्वच क्षेत्रात प्रगती करत असून देश महासत्ता होण्यासाठी महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील महिलांनी व्यवसायासह अत्याधुनिक शेती व नोकरी आदी क्षेत्रात आपले स्थान अधिक मजबूत करणे गरजेचे आहे आणि महिलांचे सक्षमीकरण व सशक्तीकरण काळाची गरज असल्याचे प्रतिपादन महानंदा दूध संघ मुंबईच्या संचालिका प्राजक्तताई सुरेश धस यांनी आष्टी येथे केले.

आष्टी येथील पंचायत समितीच्या सभागृहात आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने सोमवार दि १० मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त ३० विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांचा राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी वसीमा शेख ह्या होत्या तर प्रमुख उपस्थिती म्हणून महानंदा दूध संघ मुंबईच्या संचालिका प्राजक्तताई धस, तहसीलदार वैशाली पाटील,



गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव,तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर, केंद्रीय फिल्म सल्लागार समिती मंडळ सदस्य डॉ स्मिता बारवकर,सरपंच शालिनी मुळे, महावितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंता कोमल शिंदे, डॉ प्रियांका सिंघण, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष सुवर्णा गि-हे, सरपंच प्रतिभा थोरवे आदी मान्यवर उपस्थित होते.


पुढे बोलताना प्राजक्तताई धस म्हणाल्या की, युवा पत्रकार संघ नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असून त्यांनी तळागाळातील महिलांचा सन्मान करून एक स्तूत्य उपक्रम राबवत आहेत.कोणीही

अन्याया विरुध्द लढत असताना त्यांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. मग ती छोट्या घरातील महिला असो किंवा माझ्यासारखी राजकिय घराण्यातील असो जेव्हा माझ्यावर अ‍ॅट्रॉसिटीचा खोटा गुन्हा दाखल करून मला त्यामध्ये गोव्यण्याचा प्रयत्न करण्यात आला होता ज्यांनी मला त्रास दिला त्या विरुध्द मी एक महिला असूनही माझ्यावर झालेल्या अन्याया विरोधात मी ताकतीने आवाज उठविला आणि मला न्यायदेवताने न्याय दिला आणि मला त्रास देणाऱ्याची आज काय अवस्था झाली आहे हे सर्व बीड जिल्ह्यातील जनता उघड्या डोळ्यांनी पाहत आहे त्याची फेड त्याला लगेच मिळाल्याचे त्यांनी बोलताना मनातील भावना व्यक्त करून सांगितल्या.

यावेळी बोलताना उपविभागीय अधिकारी वसीमा शेख म्हणाल्या की, जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमाला छेद देणारा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम आज महिलांनी विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे.अशा कर्तबगार महिलांचा जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते परंतु आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचा जागतिक महिला दिनानिमित्ताचा महिला पत्रकार नसताना ही पुरूष पत्रकार बांधवांनी सर्व कार्यक्रमाला छेद देणारा कार्यक्रम घेतला आणि मागिल अनेक वर्षांपासून पुरुषांनी महिलांचा सन्मान करण्याचा उपक्रम मी पहिल्यांदाच पाहत आहे.आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विविध क्षेत्रातील महिलांना पुरस्कार देऊन सन्मान केला. पान ३ वर

## माजलगावात प.पु.जयशेखर मुनी यांच्या सानिध्यात जैन होळी चातुर्मास

माजलगाव । प्रतिनिधी



दरवर्षी प्रमाणे याही वर्षी माजलगावात जैन परंपरेने होणारा होळी चातुर्मास दि.१३ मार्च २०२५ रोजी येथील श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ यांच्या वतीने येथील राजस्थानी मंगल कार्यालयामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांसह होळी चातुर्मास संपन्न होईल.

यावर्षी या होळी चातुर्मासाच्या निमित्ताने जैन मुनी आचार्य प्रवर पार्श्वचंद्र म.सा. चे आज्ञाधारक, प्रवचन प्रभावक मुनी डॉ.पद्मचंद्र म.सा. यांचे सुशिष्य सेवाभावी साधू जयशेखर मुनी म.सा. व मधुर व्याख्याता डॉ.जयघोष मुनी म.सा. आदी ठाणा २ यांच्या पावन सानिध्यात गुरुवार दि.१३ मार्च २०२५ रोजी सकाळी ८.३० ते १०.०० वाजेपर्यंत धार्मिक जाप व तसेच सकाळी १०.०० ते ११.०० ज्ञानाच्या अमृत वाणीने मधुर असे प्रवचन होणार असून सर्वधर्मीय भाविक-भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा व प्रवचन वेळी भरपूर संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## विकासकामे दर्जेदार करण्यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करावे -रणवीर पंडित

### बोरगाव येथे ग्रामपंचायत इमारत बांधकामाचा भव्य शुभारंभ

गेवराई । प्रतिनिधी

लोकांनी मोठ्या विश्वासाने आपल्याला निवडून दिले आहे. विजय काका आमदार झाले आहेत, त्यामुळे आता रखडलेली विकासकामे गतीने पुर्ण होतील. होणारी कामे दर्जेदार केली जातील. आपल्या सहकार्याची गरज असून आपल्या गावात होणारी विकासकामे दर्जेदार करण्यासाठी सर्वांनी समन्वयांनी काम करण्याचे आवाहन शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. बोरगाव येथे विविध विकास कामांचा शुभारंभ करताना ते बोलत होते.



गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे बोरगाव नवे, बोरगाव जुने व बरड येथे नुतन ग्रामपंचायत इमारत बांधकामाचा शुभारंभ मंगळवार दिनांक ११ मार्च रोजी शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक नंदकिशोर गोर्डे, विश्वांभर गोरडे, सुभाष गोर्डे, सरपंच एकनाथ बनसोडे, अशोकराव जाधव, अनिल जाधव, भाऊसाहेब खंदारे, शंकरराव जाधव, परमेश्वर जाधव, अशोक पाटील, वैजनाथ जाधव, विनायक जाधव, बाळु आवारे, तुकाराम जाधव, रमेश जाधव, रविंद्र जाधव, बाळु जाधव, कल्याण नलावडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल पान ३ वर






## अब्दुलनाफे - माईरा पहिला रोजा पूर्ण

पाटोदा : पाटोदा मुस्लिम मोहल्ला येथील शेख सुलेमान यांचा मुलगा अब्दुलनाफे वय ६ वर्ष आणि शेख अजिमसर यांची मुलगी शेख माईरा वय ८ वर्ष यांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. रखरखत्या उन्हात रमजानबद्दल प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर दिवसभरात अन्नाचा एकही कण न खाता व पाण्याचा घोट न पिता जवळपास दिवसाचे १३ तास उपाशी राहून ६ वर्षीय अब्दुलनाफे व शेख माईरा याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केल्याने नातेवाईक व मित्रपरिवाराने अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## गैरहजर अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या तक्रारींची दखल, तहसीलदार काय कारवाई करणार याकडे लक्ष

पाटोदा । प्रतिनिधी

राज्य सरकारने कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा करुन ही कामकाजाच्या वेळी अनेक जण दांडी मारत आहेत अशी तक्रार पाटोदा तालुक्यातील नागरिकांनी तहसीलदार यांना केली त्या अनुषंगाने पाटोदा तहसीलदार यांनी पाटोदा तालुक्यातील दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालयात पाहानी केली असता दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालयातील अधिकारी वेळेवर कार्यालयात हाजर राहत नसल्याचे निदर्शनास आले यावर



पाटोदा तहसीलदार निलावड साहेब काय कारवाई करणार हे पाहावे लागणार तशेच पाटोदा तालुक्यातील इतर कार्यालयात ही अशीच परिस्थिती पाहिला मिळते यामुळे त्यांच्यावर कोणाचाही धाक राहिला नाही यामुळे बीड जिल्हा अधिकारी पाटोदा तालुक्यात विशेष लक्ष देणार का? असा प्रश्न पाटोदा तालुक्यातील सर्व सामान्य जनतेला पडला आसुन पाटोदा तालुक्यातील दुय्यम निबंध श्रेणी १ कार्यालय सह, पाटोदा पंचायत समिती, कृषी विभाग कार्यालय, पाटोदा नगरपंचायत, यासह इतर कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावा तसेच कार्यालयातील दांडी बाहदर अधिकारी वेळेवर उपस्थित राहत नसल्याने थम मशीन बसवण्यात यावी अशी मागणी पाटोदा तालुक्यातील सर्व सामान्य नागरिकांकडून होत आहे.

## आ.अरविंद चव्हाण यांना विधान परिषदेवर घ्या, उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे मागणी

जालना । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांना विधान परिषदेवर घ्या अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी ११ मार्च रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी केली आहे. अरविंद अण्णा चव्हाण यांनी जालना जिल्ह्यात अजित पवार गट



राष्ट्रवादी वाढवण्याचे काम हाती घेतले आहे. राष्ट्रवादी पक्ष हा तळागाळापर्यंत पोहोचण्याचे काम केले असल्याने अरविंद अण्णा चव्हाण यांना विधान परिषद वर घ्या अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी केली आहे . यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक पान ३ वर



माजलगाव :- तालुक्यातील सुलतानपूर येथील शेतकरी सौ वर्षा अशोक नरवडे यांनी पुरुषोत्तमपुरी ३३ के.व्ही. उपकेंद्रासाठी दिड एकर बागायती जमिन दान दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना शिवाजी वाडेकर कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग बीड, उपकार्यकारी अभियंता मन्मथ स्वामी,विजयकुमार गायके,सब रजिस्टर बि.डी.दारेवार,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे



## जिल्हा परिषद गोविंदपुर शाळेचे वार्षीक स्नेहसंमेलन उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील गोविंदपुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षीक स्नेहसंमेलनाचे आयोजन दि.०८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधुन करण्यात आले होते. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

अध्यक्षस्थांनी सरपंच शिवनंदा गवते तर प्रमुख पाहुणे म्हणुन उपसरपंच पान ३ वर



बीड : जागतिक महिला दिनानिमित्ताने राज्यस्तरीय स्त्री रत्न पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यात बीड शहरातील प्रसिद्ध उद्योजिका तथा लेखिका रूपाली देशपांडे यांना स्त्री रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रूपाली देशपांडे यांच्या कार्यकर्तुत्वाची नोंद घेऊन त्यांना स्त्री रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने सविता देव, जयंत देशपांडे, राजेश राजूरकर, स्वाती राजूरकर, जयदीप परळकर, जयसिंग मामा चुंगडे, डॉ. प्रदिप कुमार उजेगर, हरीश मोटवाणी, गंगाबिशन करवा, संपादक दिलीप खिस्ती यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## जागतिक महिला दिनानिमित्त अंबाजोगाई येथे महिला कबड्डी स्पर्धा उत्साहाच्या वातावरणात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील मानवलोक च्या प्रांगणात कोरो एकल महिला संघटनेच्या माध्यमातून आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिना निमित्त त्यांच्या कार्याला, विचारांना अभिवादन करून महिलांच्या खुल्या कबड्डी स्पर्धाचे उदघाटन करण्यात आले.

या महिला कबड्डी स्पर्धेत सावित्री संघाने पहिला क्रमांक पटकावला पाच हजार रुपये मेडल व प्रमाणपत्र व ट्रॉफी देण्यात आले तर द्वितीय संगम राडी तांडा संघाने



तीन हजार रुपये मेडल व प्रमाणपत्र,व ट्रॉफी देण्यात आले आणि तिसरे बक्षीस सखी संघ अंबाजोगाई ने दोन हजार रुपये मेडल प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेसाठी एकूण आठ संघ कबड्डी स्पर्धेत उतरले व महिलांनी मोठ्या उत्साहात या स्पर्धेत खेळ खेळल्या.या कार्यक्रमाचे उद्धघाटक लाभलेल्या मानवलोक च्या मा. कल्पना ताई लोहिया, मा. अनिकेत (भैय्या) लोहिया,.मा.सविता पाटील- कबड्डी खेळाडू महिला समुपदेशक- मा. जयश्री मोले, कोरो इंडिया च्या विनया घेवदे, एकल महिला संघटनाच्या महानंदा चव्हाण, रुक्मिणी नागापुरे, अनिता नवले, भाग्यश्री रणदिवे, प्रजावती जोगदंड यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्धाटन करण्यात आले. तर एकल महिला संघटना च्या भाग्यश्री रणदिवे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमात प्रजावती ताईचे अनिकेत भैय्या यांनी खुप कौतुक करत त्यांना सन्मानित केले व शुभेच्छा दिल्या याबरोबरच नौशाद सय्यद, आम्रपाली तिगोटे, दीपक निकाळजे सर, यांच्या सह सर्व टीम उपस्थित होती, तसे या कार्यक्रमाची तयारी एकल महिला संघटना ता. सचिव प्रजावती जोगदंड, वर्षा मस्के, उज्वला खंडागळे, आम्रपाली कांबळे,यांनी परिश्रम घेतले तर मानवलोक चे सर्व टीम यांचे मोलाचे सहकार्य लाभले, तालुक्यातील लिडर्स महिला व मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## सरकारी मीडिया मॉनिटरिंग खासगी संस्थेकडे देण्याचा निर्णय मागे घ्या; तहसीलदार यांना निवेदन सादर

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांवरील बातम्यांचे संकलन व विश्लेषण करण्याचे काम खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांना आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणारा असून, माध्यम स्वातंत्र्यावर गंभीर आघात करणारा आहे. हा निर्णय मागे घेण्यासाठी काल मंगळवार दि.११ मार्च रोजी तहसीलदार यांना लेखी निवेदन सादर केले.यावेळी सरकारने निर्णय मागे न घेतल्यास बुधवार (ता.१२) रोजी लेखणी बंद आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य



पत्रकार संघ मुंबई बीड जिल्हा व वडवणी तालुका यांच्या शिष्टमंडळाने दिला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक मा श्री संजय भोकरे साहेब, राष्ट्रीय अध्यक्ष श्री अशोक वानखेडे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, राज्य समन्वयक नितीन शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी सर, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी सर यांच्या मार्गदर्शनाखाली पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे महापालिकेची मोठी कारवाई; पुण्यातील सिंहगड कॉलेजच्या ५० मिळकती जप्त, एकाचा लिलाव होणार?

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे : शैक्षणिक पंढरी असलेल्या पुणे (झींपश) शहरात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून, विविध राज्यातून शिक्षणासाठी विद्यार्थी येतात. त्यामुळे, पुण्यातील शिक्षणाला आणि येथील शिक्षणसंस्थांना वेगळंच महत्त्व आहे. त्यामध्ये, अनेक नामांकित शिक्षणसंस्थांचा समावेश असून पुण्यातील सिंहगड कॉलेज हेही नामवंत शिक्षण संकुल आहे. मात्र, सिंहगड कॉलेज संस्थेनं पुणे महापालिकेची कोट्यवधि रुपयांची थकबाकी थकवल्याने संस्थेच्या अनेक मिळकती जप्त करण्यात आल्या आहेत. पुण्यात महापालिकेने थकबाकी थकवल्याप्रकरणी नामांकित अशा सिंहगड कॉलेजला सील केलं आहे. पुण्यातील अनेक ठिकाणी असलेल्या सिंहगड कॉलेजच्या (डळपहरसरीह) तब्बल ५० मिळकती जप्त केल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार सिंहगड कॉलेज कडे ३४५ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचं समजत आहे. पुणे शहरातील वडगाव कोंढवा तसेच एरंडवणे या भागात असलेल्या सिंहगड इन्स्टिटच्यूटच्या आस्थापनांवर पुणे महापालिकेने कारवाईचा बडगा उगारला आहे. असंच आज सिंहगड कॉलेजच्या कार्यालयाला सुद्धा महापालिकेने टाळे ठोकले आहे.




महापालिकेची थकबाकी थकवल्याने पुण्यातील सिंहगड कॉलेजला महापालिकेनं चांगलाच दणका दिला असून सिंहगड कॉलेजच्या मिळकती सील करण्यात आल्या आहेत. पुण्यातील विविध परिसरात असलेल्या सिंहगड कॉलेजच्या जवळपास ५० मिळकती जप्त करण्यात आल्याची माहिती आहे. पुणे महापालिकेची तब्बल ३४५ कोटी रुपयांची थकबाकी सिंहगड कॉलेजकडे आहे. त्यामुळे, वडगाव बुद्रुक, कोंढवा, एरंडवणे येथील मिळकती महापालिकेनं सील केल्या आहेत. तसेच, सिंहगड कॉलेजच्या ऑफीसला देखील महापालिकेने टाळे ठोकले आहे. केवळ शैक्षणिक वर्ष सुरू असल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी कॉलेजमधील वर्ग सुरू ठेवले आहेत. सध्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरू असून लवकरच पदवीच्या देखील परीक्षा सुरू होत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर महापालिकेनं कॉलेजमधील वर्ग सुरू ठेवले आहेत. मात्र, विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करुन आणि पुढील शैक्षणिक वर्षाच्या अगोदर तरी संस्थेकडून थकबाकी भरली जाईल का, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. तसेच, नव्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्याही मनात गोंधळ असणार आहे. दरम्यान, एरंडवणे परिसरात असलेल्या सिंहगड कॉलेजची थकबाकी भरण्याची मुदत संपल्याने महापालिका त्या आस्थापनेची लिलाव करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे, आता सिंहगड कॉलेज प्रशासन संस्थाचालकांकडून महापालिकेची देणी, थकबाकी दिली जाईल का, या वास्तूंचा लिलाव होईल हे लवकरच स्पष्ट होईल.

# गाडलेल्या पुरातन विहिरीने पुन्हा दिले दर्शन; विहीर पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी

**आंबेगाव । प्रतिनिधी**

काही वर्षांपूर्वी गाडलेल्या पुरातन विहिरीवर साईबाबांच्या मंदिराचे बांधकाम अंतिम टप्प्यात आलेले असतानाच गाडलेली विहीर पुन्हा एकदा प्रकट झाली. ही घटना मंचर (ता. आंबेगाव) येथे घडली. ही विहीर पाहण्यासाठी नागरिक गर्दी करत आहेत. विशेष म्हणजे विहिरीवर बांधलेले साईबाबांचे मंदिर पूर्णपणे सुरक्षित आहे.



मंचर-घोडेगाव रस्त्याजवळ मंचर शहराच्या पोस्ट कार्यालयाजवळ सार्वजनिक जागेत पुरातन काळातील विहीर होती. अनेक वर्षांपासून या विहिरीतील पाण्याचा वापर बंद असल्याने स्थानिक नागरिक या विहिरीत केरकचरा टाकत होते. त्यामुळे विहिरीचे पाणी खराब होऊन दुर्गंधी सुटत होती. विहिरीच्या पाण्याचा दुर्गंध जास्त प्रमाणात सुटू लागल्याने काही वर्षांपूर्वी मंचर ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी ही विहीर बुजवून त्या जागेत साईबाबांचे मंदिर बांधण्याचे ठरविले. मंदिर बांधण्यासाठी उद्योजक पांडुरंग सखाराम मोरडे यांनी पुढाकार घेत विहीर व्यवस्थित बुजवून त्यावर सहा इंचाचा प्लास्टर, सिमेंट पिलर टाकून विहीर बंद केली.त्यानंतर त्याच टिकाणी साईबाबांचे मंदिर बांधण्याचे काम अंतिम टप्प्यात आले; मात्र तीन ते चार दिवसांपूर्वी या विहिरीच्या वरच्या बाजूचा मातीचा भरावा पूर्णपणे विहिरीत पडला असून पुन्हा एकदा विहीर दिसू लागली आहे.

दरम्यान विहिरीच्या एका बाजूला बांधकाम चालू असलेले साईबाबाचे मंदिर सुरक्षितपणे राहिले आहे. विहिरीत मोठ्या प्रमाणात माती व पाणीदेखील आहे. ही विहीर बुजवण्यासाठी त्यात पुन्हा ५० ते ६० ट्रॉली इतर मटेरियल रविवारी (दि. ९) टाकून विहीर बुजवण्याचा प्रयत्न केला; मात्र काही केल्या ही विहीर बुजत नाही, असे पांडुरंग मोरडे यांनी सांगितले.

साईबाबांचे अर्धे मंदिर विहिरीवर असल्याने आता मंदिर सुस्थितीत असले तरी पुरातन विहीर पुन्हा एकदा प्रकट झाल्याने विहिरीबाबत कुतूहल निर्माण झाले आहे. आता या विहिरीबाबत करायचे काय, असा प्रश्न मोरडे यांना पडला आहे. ही जागा सार्वजनिक असल्याने या विहिरीचे संवर्धन करायचे की अन्य काही हा निर्णय नगरपंचायत व ग्रामस्थांनी घ्यावा, असे पांडुरंग मोरडे म्हणाले.

# पिसाळलेल्या लांडग्याच्या हल्ल्यात तीन शेतकरी जखमी

**भिगवण । प्रतिनिधी**

पिसाळलेल्या लांडग्याच्या हल्ल्यात इंदापूर तालुक्यातील लामजेवाडी येथील तीन शेतकरी जखमी झाले. सोमवारी (दि. १०) सकाळी ६ वाजल्यापासून हा थरार येथील नागरिकांनी अनुभवला. दरम्यान, वन विभागाच्या रेस्क्यू टीमने शोध घेतला असता दुपारी हा लांडगा मृतावस्थेत आढळून आला.



ताराबाई धुमाळ, रवींद्र घाडगे व मच्छिंद्र राजपुरे (सर्व रा. लामजेवाडी, ता. इंदापूर) अशी जखमींची नावे आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, सोमवारी सकाळी ६ वाजल्याच्या दरम्यान ताराबाई या नेहमीप्रमाणे त्यांच्या राहत्या घराबाहेर काम करत असताना अचानक आलेल्या लांडग्याने त्यांना चावा घेत जखमी केले.

काही वेळच्या अंतराने जनावरांचे शेण काढत असलेल्या घाडगे यांच्यावर त्याने हल्ला केला. त्यानंतर शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी दार्यावर असलेल्या राजपुरे यांच्यावर देखील हल्ला करून लांडग्याने चावा घेतला. या जखमींना बारामतीच्या मेडिकल कॉलेज येथे रेबीजचे इंजेक्शन देऊन उपचार सुरू करण्यात आले आहेत.

याची वार्ता सर्वत्र पसरताच शेतकरी व नागरिक भयभीत झाले. नागरिकांनी याची माहिती वन विभागाला दिली. भिगवण वनपरिमंडल अधिकारी विलास निकम, वनरक्षक यु. डी. मोरे, वनमजूर लक्ष्मण कुंभार यांनी घटनास्थळी दाखल होत पाहणी केली. वन अधिकारी व रेस्क्यू टीमने नागरिकांच्या मदतीने लांडग्याचा शोध सुरू केला. मात्र, दुपारी तीनच्या सुमारास हा लांडगा मृतावस्थेत आढळून आला. लांडग्याचे शवविच्छेदन डॉ. जगन्नाथ सुरवसे यांनी केले. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच लांडग्याच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे वन विभागाने सांगितले. पिसाळलेला असल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे नागरिकांनी सांगितले. सामाजिक कार्यकर्ते गोपाळ धुमाळ, भीमराव दौंड, प्रवीण धुमाळ, गणेश निगडे, भागवत मुळीक आदी ग्रामस्थांनी लांडग्याच्या शोधार्थ वन विभागाला सहकार्य केले. दरम्यान, जखमींना वन विभागाने तत्काळ आर्थिक मदत करावी, अशी मागणी गोपाळ धुमाळ यांनी केली आहे. या भागात लांडग्यासह इतरही हिंस्र प्राण्यांचा वावर असल्याने वन विभागाने जागृती करणे गरजेचे असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे.

# देहूमध्ये संत तुकाराम महाराजांची विश्वविक्रमी पगडी; आकार पाहून व्हाल थक्क

पुणे – लवकरच संत तुकाराम महाराजांचा बीज सोहळा पार पडणार आहे. यासाठी देहूनगरी सजत आहे. याच संत तुकाराम महाराज बीज सोहळ्याच्या निमित्ताने विश्वविक्रमी पगडी तयार करण्यात आली आहे. तुकाराम महाराजांची ही पगडी जाज्वंल इतिहास आणि विश्ववंदनीय साहित्याचे प्रतिक आहे. या पगडीमुळे सर्वांना संत तुकाराम महाराजांकडून प्रेरणा आणि उर्जा मिळणार आहे. याचे लोकार्पण पार पडले असून या भव्य आकार पाहून सर्वांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.



जगातील सर्वात मोठ्या जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पगडीचा लोकार्पण सोहळा पार पडला. या पगडीची नोंद वर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया न्ड जिनिअस बुकमध्ये नोंद होणार आहे. संत तुकाराम महाराजांच्या या पगडीचा घेराव हा २२ फुटांचा असून पगडीची उंची ०४ फूट आहे. ही विश्वविक्रमी पगडी तयार करण्यासाठी ४५० मीटर लांबीचा कपडा लागला आहे. या पगडीची वारकरी सांप्रदायासाठी अत्यंत महत्त्वाची आणि गौरवाची बाब मानली जात आहे.

पगडी सुती कापडापासून बनविण्यात आली: या भल्या मोठ्या पगडीचे अनावरण दिलीप सोनीगरा यांच्या माध्यमातून करण्यात आले असून, हीविश्वविक्रमी पगडी सुती कापडापासून बनविण्यात आलेली आहे. या पगडीचा घेर ३० फुटांचा असून, याची उंची चार फुटांपर्यंत आहे. या पगडीला तयार करण्यासाठी चार दिवसांचा कालावधी लागला असून, ही पगडी पारंपरिक पद्धतीने तयार करण्यात आलेली आहे. या अगोदर २८ फुटांच्या पगडीची विश्वविक्रमी नोंद झाली होती. परंतु यंदा ३० फूट घेर असलेली पगडी तयार करून हा विश्वविक्रम करण्यात आलेला आहे, असे प्रतिपादन पगडी बनवणारे शैलेश यादवांनी केलंय.

सदर पगडी शैलेश यादव यांनी तयार केली तर पवन सोळंकी हे प्रेसिडेंट अन् सीईओवर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया ॲन्ड जिनिअस बुक फाऊंडेशन यांनी सांगितले की, सदर पगडी शैलेश यादव यांनी तयार केली असून, दिलीप सोनीगरा यांच्या संकल्पनेतून ती आकाराला आली आहे. ही पगडी उंचीने पाच फूट असून, रुंदीने दहा फूट आहे आणि या पगडीचा घेर हा ३० फुटांचा आहे. त्यामुळे ही पगडी लोकांच्या आकर्षणाचं केंद्रबिंदू ठरली असून, आज देहूगाव येथील संत तुकाराम महाराज यांच्या मंदिरामध्ये पगडी ठेवण्यात आली आहे.

# पौड येथे अतिक्रमण कारवाईचा बडगा; ५० ते ६० दुकाने जमीनदोस्त

**पौड । प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांनी चांदणी चौक ते पौड या महामार्गालगतची अतिक्रमणे काढण्याची मोहीम मागील आठवड्यापासून सुरू केली असून पौड कोळवण रस्ता हा बांधकाम विभाग (पी डब्लू डी ) यांच्या कडे असल्याने सर्वांनी एकत्रित संयुक्त कारवाई पौड येथे मोठ्या प्रमाणात करण्यात आली.



पौड ताम्हिणी रस्त्यालगत असणारी अनधिकृत दुकाने, पत्र्याचे शेड रस्त्यापासून आठ मीटर अंतरावरील जेसीबीच्या सह्याने पाडण्यात आले तर पौड कोळवण या रस्त्यावरील व चौकातील असणारी अनधिकृत असणारी दुकाने जमीनदोस्त करण्यात आली. तसेच पौड एसटी स्थानकासमोर असणारी दुकाने सुद्धा पाडण्यात आली तर पौड चौकातील बहुतांश दुकाने कारवाई सुरवात होणार यामुळे दुकानंदारांनी काढून घेतली.यावेळी पौड वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी, पोलीस अधिकारी सुधीर घुले, सुधीर कदम, बालाजी कांबळे, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) चे अधिकारी कर्मचारी आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) अधिकारी कर्मचारी, बांधकाम विभाग (पी डब्लू डी ) चे अधिकारी कर्मचारी, दोन जेसीबी, अग्निशामक दल,पौड पोलीस संतोष गिरीगोसावी आणि पौड पोलीस स्टेशनचा मोठा फौज फाटा उपस्थित होता.पौड चौकातील असलेली बरेच वर्षांपासूनची दुकाने पडल्याने अनेकांच्या संसाराचा कणा मोडला असून दुकाने पाडलेल्या आर्थिक नुकसान झाले यापुढे पुन्हा व्यवसाय कोठे उभा करायचा मोठा प्रश्न दुकानदार यांच्या समोर उभा राहिला आहे.

# दुचाकी चोरुन पसार झालेल्या चोरट्याला अटक; दोन लाख २३ हजारांचा मुद्देमाल जप्त

पुणे : शनिवार पेठेतून दुचाकी चोरुन पसार झालेल्या चोरट्याला विश्रामबाग पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून तीन दुचाकी, दोन दूरचित्रवाणी संच, मोबाइल, लॅपटॉप असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चोरट्याने विश्रामबाग, सिंहगड रस्ता पोलीस ठाणे, तसेच लोणावळा शहरात दुचाकी चोरी, तसेच घरफोडीचे गुन्हे केल्याचे तपासात उघडकीस आले.मयूर अनंत डेरे (वय ३५, रा. कसबा पेठ) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. डेरे हा सराइत चोरटा असून, गेल्या वर्षी ३० नोव्हेंबर रोजी त्याने शनिवार पेठेतून एक दुचाकी चोरली होती. या गुन्ह्याचा पोलिसांकडून तपास करण्यात येत होता.

विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील पोलीस कर्मचारी मयूर भोसले, आशिष खरात, सातप्पा पाटील यांना डेरे याने दुचाकी चोरीचा गुन्हा केल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याला लोणावळा परिसरातून ताब्यात घेतले.




चौकशीत त्याने विश्रामबाग, सिंहगड रस्ता पोलीस ठाणे, तसेच लोणावळा शहरातून गुन्हे केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून तीन दुचाकी, दोन दूरचित्रवाणी संच, मोबाइल संच, लॅपटॉप असा दोन लाख २३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल, सहायक आयुक्त साईनाथ ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार, गुन्हे शाखेचे निरीक्षक अरुण घोडके, उपनिरीक्षक मनोज बरुरे, अशोक माने, मयूर भोसले, सचिन कदम, गणेश काठे, आशिष खरात, मयूर भोसले, सातप्पा पाटील, अर्जुन थोरात, शिवा गायकवाड यांनी ही कारवाई केली.

# शिरूर पोलीसांनी अवैध दारू वाहतूक करणारा ट्रक पकडला; ७५ लाखांचा मुद्देमाल जप्त

शिरूर – शिरूर बोऱ्हाडे मळा येथे गोव्याहून महाराष्ट्रातील नाशिक या ठिकाणी अवैध दारूची वाहतूक करणारा ट्रक शिरूरच्या पोलीस पथकाने पकडला असून त्याच्याकडून १ हजार ५० बॉक्स रॉयल ब्लू दारू किंमत ६० लाख ४८ रुपयांची व पंधरा लाख रुपयांच ट्रक असा एकूण ७५ लाखाचा ऐवज पोलिसांनी जप्त केला असून एक जणाला अटक करण्यात आली. पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी याबाबत माहिती दिली आहे.



मोहम्मद इम्रान मोहम्मद सलिम शेख (वय ३७, रा. घाटकोपर मुंबई) असे अटक केलेल्या आरोपीचे ट्रक चालकाचे नाव नाव आहे. याबाबत शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार शेखर झाडबुके यांनी फिर्याद दिली आहे.

याबाबत शिरूर पोलिसांनी दिलेली माहितीनुसार, आज दिनांक १० मार्च रोजी सायंकाळच्या दरम्यान न्हावरा फाटा येथे शिरूर पोलीस स्टेशनचे वाहतूक पोलीस अंमलदार शेखर झाडबुके व पोलिस अंमलदार आप्पासाहेब कदम हे पेट्रोलिंग करत असताना त्यांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, चौफुल्यावर शिरूर कडे येणाऱ्या ट्रकमध्ये दारूची वाहतूक होत आहे.

ही माहिती पोलीस कर्मचारी झाडबुके व कदम यांनी शिरूरचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांना सांगितली. पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलिस अंमलदार शेखर झाडबुके, आप्पासाहेब कदम, महिला पोलीस हवालदार भाग्यश्री जाधव, पोलीस हवालदार निरज पिसाळ या पथकाने बोऱ्हाडे मळा येथे बातमीदाराने दिलेल्या माहितीवरून चौफुला शिरूर रस्त्याहून शिरूर कडे येणारा ट्रक क्रमांक एम एच ४८ सी बी ३६०५ याचा चालक पोलिसांना पाहताच संशयास्पद हालचाल करू लागला त्यामुळे पोलिसांना त्याचा संशय आल्याने पोलिसांनी ट्रक थांबवला त्यावेळेस त्यातून दारूचा वास येत असल्याचे पोलिसांना समजले. ट्रकची तपासणी केली असता ट्रकमध्ये जुन्या कपड्यांच्या गाठोडे पाठीमागे दारू सारखे बॉक्स दिसून आले. त्याची पाहणी केली असता ट्रकमध्ये गोव्याहून आणलेली गोवा रॉयल ब्ल्यू दारूचे १०५० बॉक्स रॉयल ब्ल्यू दारूचे बॉक्स किंमत ६० लाख ४८ हजार रुपये व १५ लाख रुपये, ट्रक असा एकूण ७५लाख ४८ ऐवज जप्त केला आहे. याप्रकरणी ट्रकचा चालक याला ताब्यात घेतले असून शिरूर पोलीस स्टेशन येथे फिर्यादीवरून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण करीत आहे.

# टाकळी हाजीत महिलेला कुऱ्हाड व फावड्याने मारहाण

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. क्षुल्लक कारणावरून खून, खुनाचा प्रयत्न यांसारख्या घटना घडत आहेत. त्यात आता टाकळी हाजी (ता.शिरुर) येथील उचाळे वस्ती येथील महिलेला कुऱ्हाड व फावड्याने मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कल्पना बारहाते असे या महिलेचे नाव आहे.

कल्पना या शेतात पिकांना पाणी देत असताना देविदास बारहाते यांच्यासह काही महिला हातात कुऱ्हाड, फावडे घेऊन शेतात प्रवेश करुन कल्पना यांच्याजवळ आल्या. त्यांनी कल्पना यांना 'तू शेतात पिकांना पाणी द्यायचे नाही, तुझ्याकडे बघावे लागेल', असे म्हणून दमदाटी करत कल्पना यांना जमिनीवर पाडून कुऱ्हाड, फावड्याच्या दांड्याने बेदम मारहाण करत जखमी केले.

याबाबत कल्पना योगेश बारहाते (वय ३६, रा. उचाळे वस्ती टाकळी हाजी ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी देविदास मारुती बारहाते, अंजली देविदास बारहाते, बारकूबाई नारायण बारहाते, रंजना हरिभाऊ बारहाते (सर्व रा. उचाळे वस्ती, टाकळी हाजी, ता. शिरुर जि. पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास आता पोलिसांकडून केला जात आहे.